# हाकारा

वर्ष पंधरावे ❑ अंक पहिला

जानेवारी - मार्च १९९४



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

**स्फूर्तिस्थान / प्रेरणा :** *कै . प्रा. गं. बा. सरदार*

— : कार्यकारी मंडळ : —

**अध्यक्ष** : डॉ. पी. व्ही. सुखात्मे (पद्मभूषण)

**उपाध्यक्ष** : प्रा. व्ही. जी. पेंढारकर

**मुख्य सचिव** : प्रा. रा. के. मुटाटकर

**सहसचिव** : डॉ. पराग माणकीकर

**खजिनदार** : डॉ. व्ही. एस. कुलकर्णी

**सभासद** : डॉ. एन. एस. देवधर

: डॉ. बी. व्ही. भानू

: डॉ. मिलिंद बोकील

: डॉ. एस. जी. देवगांवकर

: ॲड. पद्माकर वळवी

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## — अनुक्रमणिका —


१) **कथा एका प्रकल्पाची डोंगरकुशीतल्या बालकांची**

*: अनुताई लिमये* ३

२) **मुंबईतले आदिवासी - कायदेशीर वंशच्छेद**

*: रा. वि. भुस्कुटे* ११

३) **राष्ट्रीय पर्यावरण जागरूकता अभिमान**

*: गो. कृ. पालकर* १५

४) **मानवशास्त्रज्ञांच्या वाटचालातील मित्रत्व व दुरस्थता(इंग्रजी ग्रंथ परिचय)**

*: सुषमा सोनक* २०

५) **महाराष्ट्रातील धनगर - एक दर्शन**

*: प्रभाकर द्राक्षे* २५

६) **कातळी निखारे (एकांकिका)**

*: अनिल सहस्त्रबुध्दे* ३१

७) **गोंदण**

*: हेमंत आपटे* ४५

८) **भटक भवानी (दीर्घ काव्य)**

*: भुजंग मेश्राम* ४५



वर्ष पंधरावे : अंक - पहिला
जानेवारी - मार्च १९९४

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर
**कार्यकारी संपादक**
ग. शां. पंडित

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद यांच्यासाठी
**मे. ओमेगा ऑफसेट**
२ व ३, एमरॉल्ड कार्नर
टिळकवाडी,
बेळगांव - ५९०००६.
फोन : ४२४१२४
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३३७२१९

**मुखपृष्ठ व आतील चित्र**
डॉ. बी. व्ही. भानू

मूल्य रु. १०/-


अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# या अंकाविषयी....

१९९४, 'हाकारा' चे पंधरावे वर्ष आणि या वर्षातला हा पहिला अंक. आतापर्यंत हाकाराने वेगवेगळ्या विषयांवर विशेषांक दिले आहेत. परंतु हा अंक मिश्र स्वरूपाचा. अनेक अडचणींतून हाकाराची ही वाटचाल सुरु आहे. ती वाचकांच्या व हितचिंतकांच्या कृपेनेच. 'हाकारा' केवळ वाचनीय अंक नसतो, तर संग्राह्य व अभ्यासनीय आहे. एम. फिल., पी.एचडी. च्या अभ्यासकांना एक मार्गदर्शक व माहितीपूर्ण नियतकालिक आहे. मानवशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादी सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांनाच नव्हे तर साहित्य क्षेत्रातील अभ्यासकांना व संशोधकांनाही ते उपयुक्त आहे. त्यामुळे हाकाराचे सभासद विविध क्षेत्रातील व्यक्ती व संस्था आहेत.

यावर्षीच्या या पहिल्या अंकात एका विशेष व्यक्तीच्या लेखाचा अंतर्भाव आहे – समाजसेविका अनुताई लिमये यांच्या. ठाणे जिल्ह्यातल्या पालघर तालुक्यातील 'मासवण' या आदिवासी वस्तीच्या गावात अनुताईंच्या 'आदिवासी सहज शिक्षण परिवार' या संस्थेमार्फत आदिवासी बालकांच्यासाठी एक प्रकल्प सुरु आहे. अनुताई या संस्थेच्या अध्यक्ष असल्या तरी त्यांचा या प्रकल्पात सक्रीय सहभाग आहे. आतापर्यंत केलेल्या कार्याविषयी व आलेल्या अनुभवांविषयी त्यांनी आपल्या लेखातून माहिती दिली आहे. वाचकांना व अभ्यासकांना ती निश्चितच उद्बोधक ठरणारी आहे. याशिवाय रा. वि. भुस्कुटे, प्रा. गो. कृ. पालकर यांचे लेखही मार्गदर्शक व वस्तुस्थितीची जाणीव करून देणारे आहेत. वाचक आपल्या प्रतिक्रिया कळवतीलच.

नववर्षाच्या सर्व वाचक व हितचिंतकांना 'हाकारा व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदे' तर्फे हार्दिक शुभेच्छा.

**– संपादक**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन तसेच परिषद व हाकाराचे संपादक सहमत असतीलच असे नाही.

# कथा एका प्रकल्पाची डोंगरकुशीतल्या बालकांची

## अनुताई लिमये

सारं जग एक आहे असं आपण म्हणतो. जगातली सारीच मुलं निष्पाप, निरागस, गोड असतात. मुलं म्हणजे देवाघरची फुलं असं साने गुरूजी म्हणत. पण प्रत्यक्षात या साऱ्या मुलांची परिस्थिती सारखी नसते. शहरातली सुशिक्षित, सुखवस्तू कुटुंबातली मुलं - दोन महिन्यातच पाळण्यावर टांगलेल्या रंगीबेरंगी चिमण्या, पोपट, रंगीर फुले यांचे सुखद रंग त्यांच्या डोळ्यांना टुकुटुकु पहायला मिळतात. खुळखुळ्याची किणकिण कानांना



समजायला लागते. ज्यांचे आई वडील, भावंड त्यांच्या लहानशा वयातच त्यांच्याशी लाडाने, बोबड्या बोलांनी बोलू लागतात. कान हळूहळू सरावतात. मुलं रांगायला लागली की त्यांच्यापुढं कापडाची अस्वलं, रंगीत प्लास्टिकच्या बाहुल्या, गोल गोल धावणारे चेंडू टाकले जातात. ते पकडायला मुलं पुढं पुढं सरकायला पाहतात, आणखी लांब जाण्यासाठी धडपड करतात. डोळ्यांना, पायांना, हातांना, कानांना आकर्षित करणाऱ्या खेळण्यांमुळे साऱ्याच अवयवांना गती मिळते. चालायला लागतात न लागतात तोच त्यांना कधीकधी वॉकर - पांगुळगाडा - मिळतो. त्यांची भीती जाते, आत्मविश्वास निर्माण होतो.

अडीच वर्षाच्या वयाला मूल पाळणाघर, अंगणवाडी, बालवाडी अशा संस्थातून जायला लागते. घरात एकटेदुकटे असलेल्या मुलांना इतर मुलांच्या सहवासात प्रथम थोडी भीती वाटली तरी सरावाने धीटपणा येतो, आनंद मिळतो, स्पर्धा करण्याची संधी मिळते. आईची अंगाई गीते ऐकायला घरी मिळालेली असतात. बालवाडीत आणखी बालगीते मुलं इतर मुलांबरोबर गाऊ लागतात. खेळायला, नाचातला लागतात. हळू हळू अभिनय करू लागतात... आणि मग? मग वळतात अक्षरज्ञानाकडे, अंकज्ञानाकडे, घरात आणि बालवाडीत खूप चित्रांची पुस्तकं, मोठ्या अक्षरांची पुस्तक हातात मिळतात. कमळातला क, गवतातला ग.. चित्रं काढणं, लिहिणं... सारं शिकतात. थोडी मोठी झाली की त्यांच्या पाठीवर पुष्कळ पुस्तकं आणि पाटी ठेवलेली दफ्तरं येतात. अंगात गणवेष चढतो... मुलं शाळेच्या बसमधे किंवा रिक्षात चढतात...आणि लांब लांबच्या चांगल्या शाळेत जातात.

**पण हे सुख भारतातल्या आणि जगातल्याही किती मुलांना मिळतं?**

१९७८ साल उजाडलं, युनोनं ते आंतराष्ट्रीय बालकवर्ष म्हणनू जाहीर केलं. जग पुढं पुढं चाललं आहे. जगातल्या प्रत्येक मनुष्य गटाला आपापले हक्क मिळावेत म्हणून प्रयत्न चालू असताल. लहान मुलांचे हक्क युनोनंच जाहीर केले आहेत. ते खरं म्हणजे निसर्गदत्त हक्क आहेत. पण मुलं ते मिळवू शकत नाहीत. अन्न, वस्त्र, निवारा, खेळायला अंगण आणि खेळण्याची साधनं, शिक्षण, हे सारे त्याचे आहेतच पण आणखी एक महत्त्वाचा हक्क म्हणजे सुरक्षिततेचा. मुलांना सुरक्षिततेची हमी मिळाली नाही की ती कावरी बावरी होतात. गरीब, निराधार, अपंग, अशा कितीतरी मुलाना हे सगळे हक्क मिळतातच असं नाही.

आंतरराष्ट्रीय बालक वर्षात समाजवादी महिला सभेनं एक निर्णय घेतला. हे सारे हक्क असूनही जे उपभोगता येत नाहीत, त्यांच्या गावात किंवा जवळपासच्या भागात शाळा असूनही जी मुले शाळेत जाऊ शकत नाहीत अशा मुलांच्या शिक्षणाचा, एखादा प्रकल्प हाती घेण्याचे ठरवले. तळागळातल्या स्त्रियांच्या जीवनात अशा मार्गाने पोचता यावं वं त्यांच्याशी जवळीक साधावी हाही हेतू त्यामागे होताच.

## आदिवासींचा सहभाग

ठाणे जिल्हा एकेकाळचा समाजवाद्यांचा बालेकिल्ला! तेव्हा आमचे कार्यकर्ते दत्ता ताम्हणे, नवनीतभाई, सोपारकर, यमु साने अशांसह जव्हार, वाडा अशी ठिकाणं पहात पहात आम्ही पालघर तालुक्यातल्या मनोर भागात पोचलो. तिथं आदिवासींच्या 'भूमिसेना' या संघटनेचे नेते काळुराम दोधडे ह्यांचे वास्तव्य असे. दामखिंडला भूमिसेनेची सभा चालू होती तिथे गेलो. आणि सभा संपताच काळुराम यांच्या बरोबर मासवण गावात आलो. लक्ष्मी बाई धापशींच्या मोठ्या अंगणात चिंचेच्या वृक्षाच्या सावलीत काळुरामकाकानी सभा बोलवली. काळुरामना सर्व काळुरामकाकाच म्हणतात. मासवणला साधारण हजारापर्यंत वस्ती. त्यात ६०% च्या वर आदिवासी, महादेव कोळी, वारली आणि अगदी गरीब कातकरी अशी लोकं. पन्नास पाऊणशे माणसं जमली. पुरुष बरेचसे लांबलांब कामाला गेलेले म्हणून पुरुष थोडेच पण बाया खूप जमल्या. काकांना सर्व आदिवासी मानतात. काकांनी सभेचा उद्देश सांगितला "या माझ्या बहिणी तुमच्या मुलांना शिकवायला आल्या आहेत. बालवाडी काढायची म्हणतात. त्यात तुमची मुलं पाठवणार का?" बऱ्याच माना होकारार्थी हलल्या. 'पाठवणार, पाठवणार' काही थोड्या धीट स्त्री पुरुषांच्या तोंडातून हळूच शब्द फुटले.

मासवण गावात जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा आहे. हरिजनगिरीजन संथेनं चालवलेली माध्यमिक शाळा पण आहे. त्यात इतर मागास समाजातली मुलं जातात. पण आदिवासींची मुलं हाताच्या बोटावर मोजण्या इतकीच.

मुलं शाळेत का जात नाहीत याचा शोध घ्यावा म्हणून एक सामाजिक - आर्थिक - शैक्षणिक पाहणी घेतली. गरिबी आणि अज्ञान ही कारणे तर स्पष्ट होती पण पाहणीमुळे आणखी बरीच कल्पना आली. आठ ते चौदा वयोगटातल्या जवळ जवळ सर्व मुली "बाळगी" म्हणून काम करतात. आई बाप लांब रानात दिवसभर कामाला गेले की मुली आणि क्वचित मुलगे देखील घरातली किंवा दुसऱ्या एखाद्या थोड्या सधन शेतकऱ्याच्या घरची मुलं सांभाळतात. दुसऱ्याची बाळं सांभाळणाऱ्या मुलांना नागलीची पेज आणि एखाद भात-माशाची आमटी किंवा कालवण मिळतं. पालकांची काळजी तेवढीच कमी होते. मुलगे प्रामुख्याने आणि क्वचित् एखादी मुलगी - सधन शेतकऱ्याची गुरे राखायला लांब कुरणभागात जातात. ही सर्व दुपारची उन्हं सुरू झाली की परततात. त्यातल्या एखाद दुसऱ्या मुलाला शाळेत जाण्याची उत्कंठा असलीच तर ती जातात पण त्यांना उशीर झालेला असतो म्हणून मास्तर बाहेरच उभं करतो. मग ते मूल पुन्हा जाईलच कशाला? रोज हा मुलगा उशिरा येतो तो का? याचा विचार आदिवासींसारख्या लांबच्या गावात बदली केल्यामुळं अगोदरच त्रस्त असलेल्या शिक्षकाला करावासा वाटत नाही. शाळेत मुलं जात नाहीत याची काही आणखीही कारणं विचारांती लक्षात आली. आपल्या शिक्षण तज्ञांनी शहरात टेबलाभोवती बसून जी पाठ्यपुस्तके लिहिलेली असतात ती शहरातल्या शाळेत आणि अशा दूरच्या अगदी वेगळे जीवन जगणाऱ्या शाळेत एकच असतात. त्यातले खरेचसे धडे आदिवासींच्या जीवनाशी सुसंगत नसतात. शाळेच्या वेळा, शिकवण्याची पद्धती सर्वत्र एकच चालू शकत नाही.

या सर्व गोष्टींची चर्चा डॉ. चित्रा नाईक यांचेशी केली. काही वेळ श्री. जे. पी. नाईक पण होते व मग चाकोरीबाहेरील किंवा अनौपचारिक पद्धतीच्या शिक्षणाचा प्रकल्प चालवण्याचे ठरवले व दहा केन्द्रांतून पाळणाघर, बालवाडी व सहा ते चौदा वर्षांच्या मुलांचे अनौपचारिक शिक्षण असे विभाग सर्वत्र सुरू केले.

आदिवासींच्या वस्तीत हिंडलो तेव्हाच काही ठळक दृश्ये इतर लोकांच्यापेक्षा निराळी अशी दिसली. रस्त्यावरून जाताना डोक्यावरून लाकडाची मोळी घेऊन लांब लांब घोळक्याने चाललेल्या स्त्रिया. जुनीच पण गुडघ्याच्यावर चापून चोपून नेसलेली साडी, अंबाड्यात कुठलीही पण माळलेली रंगीत फुलं, गळ्यात मण्यांच्या माळा. बहुतेक सर्व जणी शिडशिडीत, मूकपणे चाललेल्या स्त्रिया; कमरेला एक लुंगीवजा वस्त्र गुंडाळून व अंग उघडेच असे

काळेकुळकुळीत हातात विळा किंवा कोयता घेऊन चाललेले पुरुष आणि मोठी असली तर एक लंगोटी लावून आणि लहान असली तर नागडीच अशी मुलं. मुलांच्या हातात पुष्कळदा गोफण-पक्षी मारायला किंवा उंच झाडावरची फळं तोडायला. काहींच्या हातात पाण्यातले मासे पकडण्याचा गळ. जणू हीच त्यांची करमणूक करण्याची खेळणी.

## बालवाडीची सुरुवात

मासवणला पहिली बालवाडी सुरू केली. पुण्याच्या निवृत्त प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका ह्या मासवणला राहण्यास आल्या. त्यांनी पुढं तर हे आपलं एक आवडतं कामच मानलं. मुलांना गोलाकार बसवलं. शिक्षिकेनं मध्यभागी रंगीबेरंगी खेळणी ठेवली. सारी मुलं डोळे मोठे करून त्याकडे पहात होती. त्यांच्या डोळ्यात हाव नव्हती. जणू ही आपल्यासाठी नाहीतच. कशी असतील? अशीच त्यांची समजूत असावी. पण शिक्षिकेनं सांगितलं "ही सारी तुमची खेळणी. तुमच्यासाठी आणलेली. घ्या आता एकेक". मग हळू हळू धिटुकली मुलं पुढं आली. त्यांनी खेळणी उचलली. आणि मग चार-आठ दिवसात मुलं बाईंच्या मागं मागं हिंडू लागली "मला चेंडू, मला भावली," म्हणून हक्कानं मागू लागली.

अकरा ठिकाणी केन्द्रे सुरु झाली. पाळणाघरात तान्ही मुलं, बालवाडीत सहा वर्षापर्यंतची मुलं आणि पुढची चौदा वर्षापर्यंतची अनौपचारिक शिक्षणात. त्यांच्या जीवनाशी सुसंगत अशी कोसबाडहून घेतलेली प्रार्थना मुलं म्हणू लागली.

"पायाखाली भूमी माता तुडवितो येता जाता'
नको रागावू तू आई पहिलं नमन तू घेई'
आकाशीचा थेंब गळे झुलु झुलु पाणी पडे।
अंत नाही आकाशाला दुसरे नमन पाण्याला।।
डोंगराच्या आडोशाला हिरवा झाडोरा फुलला ।
त्यात सूर्य उगवला तिसरं नमन हे त्याला।।
वारा वाहतो एकटा खुल्या त्याला चारी वाटा
पान फुले डोलविले चौथे नमन मी केले
पृथ्वी पाणी सूर्य वारा आम्ही नमू आकाशाला
याच पाचानी पाळावे रोज आम्ही त्या नमावे।"

आदिवासी दगडाच्या देवांची पूजा करीत नाहीत. सृष्टीतली ही पंचमहाभूतं हीच त्यांची दैवतं! सृष्टीशी, निसर्गाशी एकरूप झालेली ही मंडळी.

शिक्षणाची सुरुवात करतांना प्रथम मुलांची भीती, संकोच घालवावा म्हणून गाणी, खेळ, नाच या कलांवरच भर दिला.

"आकाशाची आम्ही लेकरं काळी माती आई।
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही।।"

अशी खूपशी गाणी मुलांनी भराभर पाठ केली. लंगडी, कबड्डी, खो खो, उभा खो खो असे खेळ पण आवडले. त्यांची गाणी, त्यांचे नाच त्यांनी करून दाखवले.

एक दिवस सण आला. कातकरी पाड्यातून आवाज आला. पाहिलं तर दुधी भोपळ्याचा 'तारपा' (शिंगासाखे वाद्य) फुंकीत मध्यभागी तारपावाला नाचत होता आणि तरुण स्त्रिया, तरुण पुरुष, एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून गोल फिरत नाचत होते. तारपावाल्याने गती वाढवली की यांची पण गती वाढत होती. मधेच गोलाची फिरण्याची दिशा बदलून उजवीकडे सर्वजण फिरत. नृत्यात विविधता फारशी नाही. पण पायात अंगात लालित्य मात्र खूप. स्त्री पुरुषांचा एकत्र नाच पण इतकी सहजता होती. कुठेही वासना किंवा शृंगारिक हालचाली दिसत नव्हत्या.

## बायाचं शिबिर

पहिले केन्द्र सुरु होऊन एक दीड महिना झाला आणि आम्ही ठरवलं आता या मुलांच्या कुटुंबातल्या बायांचे एक शिबिर घ्यावं. त्यांचा सहकार मिळाला पाहिजे.

मासवणलाच तीन दिवसांचं बायांचं शिबिर घेतलं. शिबिराला आदिवासी बायांबरोबर इतर बाया पण आल्या. ताम्हाण्यांचं भाषण सुरु असतानाच एक धनिक आदिवासेतर समाजातली बाई माझ्यापाशी सारखी बोलत राहिली. "आहो हे कधीच सुधारणार नाहीत. आम्ही कमी का प्रयत्न केला?" मी भाषण करण्यास उठले तेव्हा सांगितले "कुठलाही समाज कधीच सुधारणार नाही असं आम्ही मानत नाही. मनुष्य इथून तिथून सारखाच. जाती पाती वर्ण भेदामुळे काही जातीतून पूर्वापार शिक्षण मिळत राहिलं आणि काहींना शिक्षणापासून दूरच ठेवलं गेलं. हरिजन, आदिवासी व स्त्री या तीनही समाजांना प्रतिष्ठित समाजाने शिक्षण नाकारले होते. त्यामुळे पिढ्यानूपिढ्या ही मंडळी अज्ञानी राहिलेली. आता लोकशाही आहे. आता सर्वांना समान अधिकार आहे. सर्व शिकू शकतील." पंधरा वर्षात त्या बाईचं मत पुष्कळच बदललं.



४२९५.६७

पहिल्या दिवशी एक बाई जरा बरी उत्तर देत होती. दुसऱ्या दिवशी इतर बाया आल्याच नाहीत. फक्त आदिवासीच आल्या. पण काल चांगलं उत्तर देणारी आदिवासी बाई मात्र दिसली नाही. मी विचारलं "का ग काल सुलीची आई होती ती आज दिसत नाही?" एक दोन बाया म्हणाल्या "बाई लई कुटलं तिला राती." मला आश्चर्य वाटलं. विचारलं "कुणी मारलं इतकं? का मारलं?" उत्तर मिळालं "तिच्या दादल्यानं. आला होता माजून बेवडा पिऊन." मी म्हटलं "इतकं मारलं? तिनं का मारून घेतलं? " बाया म्हणाल्या "बाई आमाला समद्यांनाच नवरे मारत्यात, पिऊन आले म्हंजे" त्यांना हे नेहमीचंच होतं. त्यात काही वाईट घडतंय, अन्याय होतो आहे असं वाटतच नव्हतं. बाया त्या मार खाणार बापे ते दारू पिणार आणि मारणार. जणू हक्कच त्यांचा तो. माझ्या मनात एकदम विषण्णता आली. मला वाटलं होतं आदिवासी आम्हा मध्यम वर्गातल्या शहरी बायांपेक्षा पुष्कळ स्वतंत्र असतील. कारण आमच्या सारख्या खोट्या प्रतिष्ठेच्या त्यांच्या कल्पना नसतात. पण माझ्या कल्पनांना तडा गेला. मग मी त्यांना खूप चर्चा करून वळणावर आणण्याचा प्रयत्न केला. मी म्हटलं "तुम्ही बाया घरातला स्वैपाक, पाणी लांबून आणणं, मुलाबाळांचं करणं, स्वच्छता सारं काम करता ना?" "व्हय कामच त्या आमचं." "तुमी नवऱ्या सारख्या शेतावर पण कामाला जाता ना? कमावताना? "हो कामावर जातो पैसा कमावतो पण पैसा तर दादलाच लुटतो."

मग मी विचारलं. "इतकं करून तो दारू पिऊन तुम्हाला मारतो. काय गुन्हा तुमचा"?

"आमी काय गुना केला बाय?"

"गुन्हा नाही केला मग मार का खाता? आणि तो दारू पिऊन येतो म्हणजे त्याचा गुन्हाच की आणि तो तुम्हाला मारतो. तुम्ही मार खाता हे काही ठीक नाही."

"काय करणार आमी ताई! बापे मारत्यांतच समद्यांना?"

मग मी त्यांना सावद्याचा प्रयोग सांगितला.

"तुम्हाला एकटीला नवऱ्याच्या माराला तोंड देता येत नाही. मग आता तुम्ही सावद्याच्या बायांसारखं करा. तिथल्या बाया पण आदिवासी बायाच आहेत. पण त्यांनी आपली संघटना केली रात्री ज्या झोपडीत मार खाण्याचा आणि रडण्याचा आवाज येतो तिथं आठ दहा बायांनी मिळून जायचं आणि त्या दारूड्या आणि मारणाऱ्या नवऱ्याला बाहेर काढायचं "माजून आला आहेस तोपर्यंत या घरात यायचं काम नाय. ही झोपडी बाईची आन पोरांची हाय." मग इतक्या बाया पाहून तो नवरा दुसऱ्या दिवशी पिऊन आला तर बाहेरच उभा राहतो.

बायांना हे पटलं. घरी जाताना एकमेकीला बोलू लागल्या 'ए पार्वती बघ हं. आता माझा नवरा मारायला लागला की या बर कां तुमी समद्या."

पुरुषांची दारू आम्ही बंद करू शकलो नाही पण बायांचा मार मात्र बंद झाला. आता पुरुषांना धसका बसला असावा. आणि चांगल्या विचार करण्याच्या परिस्थितीत पटलं पण असावं.

त्यानंतर आणखी एक केन्द्र काढायचं म्हणून मी आणि भाई अडीच किलोमीटर अंतरावरच्या वांदिवळी खेड्यावर गेलो. गावातली जरा मोठीशी झोपडी पाहून आत शिरलो. ती शिबिरावर आलेल्या रेखाची होती. मी आत गेले, चुलीवर एक मोठ भगुलं खदखदत होतं. मी अगदी सहजगत्या विचारलं

"येवढा भात शिजवता तुम्ही?"

रेखाची सासू म्हणाली "भात निही ताई दारु हाय!"

तिनं इतक्या सहज उत्तर दिलेलं पाहून मी चकित झाले. माझ्या अज्ञानाची मला लाज पण वाटली. तरी मी तिला म्हटलं "अग काल शिबिरात तुम्ही गाऱ्हाणं मांडत होतात की नवरे दारु पिऊन तुम्हाला मारतात. आणि इकडे तर तुम्हीच दारु गाळता?"

ती बाई जरा नरमली आणि म्हणाली "काय करायचं ताई! तेवढंच चार आनं सुटल्मात पोरांना झुरूक खायला आणतो."

तिचं हे उत्तर ऐकून मीच नरमले. मग एकदम मी तिला विचारलं." रेखाच्या सासूबाई आमी या तुमच्या झोपडीत पाड्यातल्या मुलांसाठी बालवाडी काढणार आहोत. तुम्हाला तिथे आयाचं काम मिळेल. पगार मिळेल. मग सोडाल का हे काम?"

बाई एकदम आनंदली तिनं ते भगुलं उचललं आणि खाली आपटलं. फोडलं. "हे बघा ताई फोडलं भगुलं. आमाला काय हे वंगाळ काम भावतं व्हय!" मला आनंद झाला. त्या झोपडीत दुसऱ्या दिवशीपासून बालवाडी सुरु केली. रेखाच्या सासुला आया नेमून टाकलं. अशा आणखी एका ठिकाणी झोपडीतल्या

बाईने अशीच साथ दिली. पण इतर अनेक बाया घरोघर दारु गाळतात हे नंतर लक्षात आलं. हळू हळू केन्द्राच्या कामाच्या कक्षेत येणाऱ्या बऱ्याच बायांनी दारु गाळणं बंद केलं. पण काहींनी स्पष्टच सांगितलं "त्यातून आमाला चांगला पैसा मिळतो."

बायांची विविध विषयांवर बरीच शिबिरं झाली. वर्षाला किमान एक तर होतंच. कुटुंब कल्याण, बचत, कौटुंबिक कायदे, ग्रामीण महिलांसाठी उद्योग, स्वच्छता व आरोग्य, बाळांचे संगोपन, स्त्री स्वातंत्र, शिक्षण, पाककला व सकस आहार असे अनेक विषय शिबिरातून घेतले. दोनशे बायका यातून तयार झाल्या. न बोलणाऱ्या बाया बोलायला लागल्या. बचत करू लागल्या, मुलांना स्वच्छ ठेवू लागल्या. मुलींच्या वेण्या घालू लागल्या. कार्यकर्त्यांच्यासाठी स्वैपाक करणारी मंगळी आणि पुढे कमा सुंदर स्वैपाक करू लागल्या, पाहुणे येत ते नेहमीच मंगळीच्या आमटीची, कमाच्या भाजीची तारीफ करीत.

सोळा वर्षाची संगीता एकदा म्हणाली"आता नवरा मला छळायला लागला तर घटस्फोटच घेईन".

आदिवासींमधली वेठबिगारी म्हणजे सावकार जमीनदारांच्या छळाचा एक क्रूर नमूनाच. काळू हा एक हुशार तरुण आमच्या संपर्कात आला. तो थोडा शिकला होता. सोसायटीत कामाला लागला होता. त्याचा बाप सावकाराकडे काम करीत होता. सावकार राबवून घेत होता. पण तो वारला. त्याने सावकाराचे कर्ज घेतले होते ते फिटले नव्हते (ते कधीच फिटत नसते. कारण निरक्षर आदिवासी कधीच हिशोब ठेवू शकत नाहीत व त्यांचे शोषण करणारा सावकार त्यांची फसवणूकच करत राहतो) शेवटी काळूला नोकरी सोडून सावकाराकडे बापाच्या जागी कामाला जावे जागले. हीच पद्धत वेठबिगारीची. ही वेठबिगारी काही वर्ष केली. त्याची छळणूक झालीच पण मग कायदा झाला आणि वेठबिगारी बंद करावी लागली. तेव्हा काळू मुक्त झाला. त्याला तहसीलदार कचेरीतून बकऱ्या मिळाल्या. त्याचे पुनर्वसन सुरु झाले. नंतर दारुपायी आपल्याच कर्माने काळूने मृत्युला कवटाळलेही त्याची शोकांतिका.

## विविध योजना राबविल्या

जिल्हा परिषदेकडून केंद्र सरकारच्या निर्धूर चुलीची शिबिरांची योजना आली. पुष्कळ बाया चिखल तुडवून निर्धूर चूल बनवायला शिकल्या. यमनामावशी, वासंती, कल्पना या आयाशिक्षिका भोवतालच्या गावातून शिबिरांवर शिकवून पण आल्या.

कोंबडी पालनाचा प्रयोग झाला. तवलीच्या शिबिरावर यशस्वी झाला. पण सागाव गरीब आणि अडाणी लांबचं आतलं गाव. नव्यानंच काम सुरु झालेलं. तिथं कोंबड्यांचा उपयोग घरातच झाला.

शिवण कामाच्या योजनेतून अनेक तरुण मुली शिकून स्वतःचे मशीन घेऊन काम करू लागल्या.

मुख्य म्हणजे प्रकल्प चालवण्यासाठी झोकून देणाऱ्या प्रकल्पावर दहा दहा वर्षे राहणाऱ्या इंदुताई सुमन, सुधाताई यांच्यासारख्या ध्येयवादी कार्यकर्त्या मिळाल्या. शुभांगी जोशींनी माझी जबाबदारी पुढे स्वीकारली. मुंबईहून सकाळी येऊन संध्याकाळी परत जाणाऱ्या लक्ष्मीबाई तंबाकू, शीलाताई, सुधाताई या मिळाल्या हसेसारखे पुरुष कार्यकर्ते मिळाले. ज्योती, प्रेरणा, सुलभा, अशा काही तरुण कार्यकर्त्यांनीही वर्ष वर्ष दिले. आदिवासींनी पण प्रकल्पात जबाबदाऱ्या स्वीकारल्या. चार आदिवासी शिक्षिका, वीस आया सर्व आदिवासी ड्रायव्हर. सुरेश हा ड्रायव्हर आणि एक कष्टाळू कार्यकर्ताच मिळाला. रमेश हा सहचिटणीस झाला. हळू हळू आदिवासींनी सर्व जबाबदारी घ्यावी हेच प्रयत्न आहेत.

बेकरी सुरु केली. त्यातून रमण, सुरेश चांगले बटर, पाव तयार करू लागले. जयवंतीने साथ दिली. नाना कुडूंनी कोकणेरच्या जमिनीवर सुंदर बाग आणि सामाजिक वनीकरणाचा प्रयोग केला.

मुलांच्या शिक्षणाचे प्रयोग चालू होते. पाळणाघरे काढून बाळांना ठेवण्याची सोय झाली आणि मोठी मुले शिकायला येऊ लागली. भाषा, गणित आणि थोडा फार इतिहास भूगोल एवढेच विषय घ्यायचे. गोष्टी सांगितलेल्या खूप आवडायच्या. कुठल्याही मुलाला पहिल्यांदा माहीत असलेली गोष्ट म्हणजे लाकूडतोड्याची.

मुलांच्या परीक्षा घ्यायच्या नाहीत. त्यांना 'नापास' करायचं नाही. ज्यांच्या जीवनांत खूप नकारच आहेत त्यांच्यात आणखी एका नकाराची भर घालायची नाही असं चित्राताईनी सांगितलेलं. तेव्हा वर्षातून तीन वेळा जवळची केंद्र एकत्र करायची आणि हसत खेळत कार्यक्रम करीत मग त्या मुलांच्या प्रत्येकाच्या चाचण्या घ्यायच्या. 'रमेश तू गणितात या तिसऱ्या पायरीवर चढला आहेस इतिहासात मात्र पहिल्या पायरीवर' या भाषेत जाण द्यायची. बरीच

मुलं पुढं जिल्हा परिषदेच्या शाळेत जाऊ लागली. केंद्रातून गेलेली मुलं तिथं चांगले गुण मिळवायची.

बाळगी मुलांचा प्रश्न सोडवला, गोवारी मुलं उशिरा येत त्यांना आल्यावर दोन तास मिळतील तितकं शिकवायचं अशी सवलत दिली. पण चारपाच वर्षांनंतर एक नवीनच पेच उभा राहिला. मुंबईच्या सदनिका उठतात त्यासाठी लागणाऱ्या विटांच्या भट्ट्या मासवण, कोकणेर भागात सुरु झाल्या. खडी मशीन्स आली. सूर्या नदीतून वाळू काढून ट्रकमधे भरण्याचे काम आले. दहाबारा वर्षाच्या मुलांना या कामात बऱ्यापैकी पैसा मिळू लागला. मग आईबापांनी त्यांना पाठवायचं बंद केलं. शिक्षणापेक्षा पैशाचं महत्त्व जास्तच.

शेवटी आम्हाला दिवसाच्या वर्गाऐवजी कामावरून मुलं घरी येत त्यानंतर सायंवर्ग घेण्याची शासनाची योजना चालवावी लागली. मुलांना शिक्षणाची गोडी लागली होती त्यामुळे ती येत पण दिवसभरच्या कामावरून दमून येत व जेमतेम पावणेदोन तास मिळत. पण ती योजना चालू आहे.

वैद्यकीय काम मात्र खूप उपयुक्त ठरले. संचालक पदाची जबाबदारी सुमनताईंने जितक्या कार्यक्षमतेने सांभाळली तितक्याच कार्यक्षमतेने डॉ. सुधा रणदिवे यांनी वैद्यकीय व सकल आहाराची योजना सांभाळली. सुरुवातीला सर्व मुलांना खरुज होती पण उपचारानंतर खरुज पूर्ण गेली. नवी मुले आली तर त्यांना असते. ती पण जाते. पोटाची पचनाची दुखणी, ताप थंडी हे आजार हंगामी असतात. पण सकाळी नाचणीची पेज व मोठ्यांना दाणे गूळ, एकवेळचे जेवण - त्यांचे अन्न भात म्हणून आठवड्यातून चार दिवस भात पण त्याबरोबर भाज्या घातलेली डाळ, उसळ व पाव, कधी मुगाची खिचडी असा सकल आहार दिला जातो. त्यामुळे अन्नाच्या कमतरतेने निष्पन्न होणारे आजार कमी झाले. शासनाच्या एक मैलावर असलेल्या उपआरोग्य केंद्रावर आदिवासी जात नसत. अति झाले तर एकदम पालघरच्या आरोग्य केंद्रावर धावा घ्यायची. एरवी भगत हाच त्यांचा वाली जणू. आजार झाला भगताकडे जा, लग्न, मर्तिक, मुलाचा जन्म सर्वच कार्याच्या वेळी भगताला पाचारण असे. पण डॉ. बाई कितीतरी वर्ष वैद्यकीय शिक्षण घेऊन आल्या आहेत. माणसाच्या शरीराचे, रोगांचे, औषधांचे त्यांचे ज्ञान आहे. भगताला काही वनस्पती माहिती असतील पण बाकी त्याचा असा अभ्यास असतो का? वगैरे चर्चा केल्यानंतर डॉक्टरचे महत्त्व व मुख्य म्हणजे डॉक्टर बाबतचा विश्वास पटला व लोक दवाखान्यात येऊ लागले. मुलांची वजने, वैद्यकीय तपासणी या गोष्टी तर पाळीपाळीने सर्व केंद्रांवर चालतच.

दोन वर्षांपूर्वी जव्हार विक्रमगड भागात आदिवासींवरच्या रोगराईच्या कथा पुष्कळ वाढत होत्या. काही वेळा दारु म्हणून सांडलेले पेट्रोल घेणे अशाही अघोरी गोष्टी ऐकू येत. पण तहसीलदारांच्या सरकारी अहवालात आमच्या केंद्राच्या सभोवतालचा परिसर या अघोरी गोष्टी किंवा साथी यापासून अलिप्त राहिला असल्याचा उल्लेख आला तेव्हा कामाचे काहीसे साफल्य झाल्याचा आनंद मिळाला.

जागृत माता व सुदृढ बालक अशी स्पर्धा दरवर्षी प्रत्येक केंद्रावर घेतली जाते. त्यामधे भाग घेणाऱ्यांची संख्या आता वाढत चालली आहे.

वीस मैलांच्या साऱ्या परिसरात हायस्कूल फक्त मासवणलाच. त्यामुळं चौथीपर्यंत किंवा सातवीपर्यंत शिक्षण झालं की मुलींची गळतीच होते. त्यांना लांब पाठवण्याऐवजी घरात कामाला ठेवणं बरं वाटतं. म्हणून दोन वर्षांपूर्वी तीस मुलींचं एक वसतिगृह चालू केलं. आज या मुलींची गळती टळली व त्या शिक्षण घेत आहेत. इंदुताई या वयातही त्याचं सर्व नीट बघतात. यमनामावशी मदत करते.

## मंगळी-कमाची फसवणूक

शहरी लोकांच्या प्रतिष्ठेच्या कल्पना मात्र आदिवासींमधे नाहीत हा स्त्रियांच्या बाजूचा एक मुद्दा आहे. केंद्रावर स्वैपाक करण्यात येणारी मंगळी ही उत्तम स्वैपाक शिकली हे मागे झालेच. पण हळू हळू तिची कहाणी समजली. नाकी डोळी नीटस व मोहक चेहरा असलेली मंगळी उदास दिसायची. तिच्यावर भाळून वंजाऱ्याच्या एका सधन तरुणाने तिला आपल्याकडे ठेवली. ती लग्न करण्याचा आग्रह धरीत होती. पण पुढे पाहू करता करता तिला एक मुलगी व दोन मुलगे झाले. मुलं गोरी व मोहक चेहऱ्याची होती. पण काही वर्षांनी मोठ्या भावांच्या आग्रहाला बळी पडून त्या तरुणाने जातीतल्या एका मुलीशी लग्न लावले. मंगळी आपल्या झोपडीत मुलांसह परतली तो तरुण आपल्या बायकोला घेऊन पालघर तालुक्यातून बाहेर लांब कुठेतरी जाऊन राहिला. त्याच्या भावांनी एकदा मंगळीला काही पैसे देऊन कागदावर तिचा ठसा घेतला होता. पण आम्ही त्यानंतर पुण्याच्या लॉ कॉलेजच्या प्रि. साठ्यांचा सल्ला घेतला. बिगर

कायद्याच्या संबंधांतून जन्माला आलेल्या मुलांसाठी त्याच्या आईला गावातल्या काही मंडळींनी साक्ष दिली तर मुलांच्या संगोपनासाठी पोटगी मिळू शकते, ही माहिती मिळाल्यावर आम्ही त्या तरुणाच्या बंधूंना सांगितले व मुलांच्या पोटगीची व्यवस्था करा म्हणून मागणी केली. त्यांनी मागणी मान्य करून मंगळीला दरमहा ठराविक रक्कम पाठवण्यास सुरुवात केली. मंगळी लग्नाविना एका तरुणाकडे राहिली तिची मुलेही अनौरस संतती हे सर्व माहीत असूनही मंगळीला कुणी वाळीत टाकलं नाही, तिची कुचेष्टा केली नाही. उलट तिला सहानुभूतीच मिळाली.

कमा संस्थेत कामाला लागली. अत्यंत शांत, कष्टाळू होती. तिच्या कुटुंबातील माणसेही समंजस. कमाने संस्थेच्या शिकवणीची जाणीव ठेवली होती. तिला दोन मुलगे होते. आता तेवढेच पुरेत म्हणून ती डॉक्टरबाईंना म्हणाली माझं ऑपरेशन करायचं. डॉक्टरनी तिला पालघरच्या कुटुंब नियोजन केंद्रात पाठवलं. ऑपरेशन केलं असं डॉक्टरनी सांगितलं व दुसऱ्या दिवशी तिला परत पाठवलं. तीन महिन्यांनी तिला पुन्हा दिवस गेले. ती रडत डॉक्टरना सांगायला आली. डॉक्टरबाईंनी पालघरच्या डॉक्टरना तक्रार सांगितली. ते डॉक्टर बेपर्वा होते. म्हणाले "होते एखादी केस अशी". डॉक्टरबाईंना शंका वाटली म्हणून त्यांनी कमाला ठाण्याच्या हॉस्पिटलमधे नेले. तिथल्या डॉक्टरांनी तपासून सांगितले की हिचे ऑपरेशन वगैरे काहीही केलेले नाही. डॉक्टरांच्या बेपर्वाईची कमाल होती. त्यांना सरकारकडून ऑपरेशनचे पैसे मिळाले होते. एका पंगु गरीब आदिवासी स्त्रीला त्यांनी फसवले होते. कमाला नंतर नुकसानभरपाई म्हणून नऊशे रुपये शासनाकडून मिळाले. तिने लागलीच त्यातले शंभर सुमाताईकडे संस्थेला मदत म्हणून आणून दिले. गरीब पंगु पेशंटच्या जीवाची फसवणूक करणारा स्वार्थी डॉक्टर कुठे आणि गरीब पण जाणीव ठेवणारी कमा कुठे? डॉक्टरवर कारवाई करावी म्हणून आम्ही मागणी केली. आज कमाची चिमणी पाच वर्षांची आहे. गोड मुलगी. शाळेत जाते.

## निसर्ग हाच गुरू

केंद्रे सुरु झाली. एक दिवस एक दोन मुली बांबूच्या काड्यापासून बनवलेल्या छोट्या बाहुल्या घेऊन आल्या. बाहुल्यांना चिंध्यांची साडी नेसवली होती. काळ्या सुताने डोक्यावर केस आणि त्यांची वेणी घातलेली. हातात पायात गळ्यात मण्यांचे दागिने. मला आश्चर्य वाटलं. म्हटलं "कुणी ग केल्या ह्या भावल्या? त्या म्हणाल्या 'आमीच केल्या". कुठं शिकलात?' 'असंच आमी मनानंच केल्या" मला कौतुक वाटलं, ह्यांच्या हातात ही कला? कुठे क्लासला गेल्या नाहीत. कधी प्रदर्शन पाहिली नाहीत.

मुलांसाठी एकदा आम्ही एक रंगीत लाकडी चौकट आणली. त्यावर इकडून तिकडे चढायला गंमत वाटते. बाहेर झाडांच्या सावलीत ती ठेवली. मुलांना ते आकर्षक रंग आवडले. ती भराभर वर चढली खाली उतरली. आणि मग दोन-चार मुलं भराभर जवळच्या आंब्याच्या झाडावर चढली. इतक्या सरसर ती चढली इतकी लहान मुलं मी बघतच राहिले. मग मनात आलं कशाला आणलं आपण हे कृत्रिम वाहन? मुलं तर या पेक्षाही उंच झाडावर भराभर चढताहेत.

अगदी बालवाडीतली मुलं देखील त्यांना गुंजा नाही तर चिंचोके दिले आणि खडूने एखादा गोल, चौकोन, त्रिकोन काढला तर त्यावर गुंजा ठेवून आकार बनवू लागली.

एकूण मुलांच्या हातातच कला आहे. पायात कला आहेत. गळ्यात आवाज आहे. कुठून आलं हे सारं?

पं. नेहरूंच्या एका पुस्तकात वाचलेलं आठवलं. निसर्गाच्या कुशीत जी बालकं राहतात ती निसर्गाकडूनच सारं शिकत असतात. झाडांच्या वेलींबरोबर, पानांबरोबर ती डोलायला लागतात. पक्ष्यांचा मंजुळ आवाज त्यांना गायला स्फूर्ती देतो. आनंद झाला की वाऱ्यासारखी ती धावतात, पळतात. निसर्गातले फुलांचे, पक्षांचे रंग त्यांना कलेची दृष्टी देतात.

आदिवासी लोकांचं जीवन जमीन, जल आणि जंगल या तीन पायाभूत निसर्ग साधनांशी निगडित आहे. ते जमीन कसतात. पाण्यातले मासे, बेडुक, खेकडे हेही त्यांचे अन्नच. आणि जंगलातली लाकडं तोडणे व सरपण विकणं हे त्यांचं उदरनिर्वाहाचं साधन जंगलातली फळं, बोरं, करवंद, जांभळं, आंबे, चिंचा हाच त्यांचा आवडता मेवा.

आदिवासी जंगलातली लाकडं तोडत असले तरी निसर्गाबद्दल त्यांना प्रेम आहे. बायका जरा बोलायला तयार झाल्या, पर्यावरणाचा अर्थ त्यांना थोडा समजला तेव्हा त्या सांगू लागल्या "ताई आम्ही लाकडं तोडतो पण ती आमच्या डोईवर राहतील तेवढीच. आमाला



395.3A

तसा परवानाच हाय. पण हे लॉरीवाले येतात. त्यांना परवाना नाय तरी ते जंगलात जातात आणि लॉरी भरून लाकडं ममईला नेतात घरं उठवायला. पोलिसांनी अडीवलं तर ते पोलिसांना कोंबडं चारत्यात. आमी मात्तर परवाना हाय तेवढीच फाटी आणतो पण आमचा विळा पोलीस काढून घेतात- आमाला त्यांना चारायला कोंबडं नाय म्हणून.

आदिवासी सृष्टीवर, निसर्गावर मनापासून प्रेम करतात म्हणून ते वाटेल तशी जंगलतोड करीत नाहीत. बिहारमधे सुंदरलाल बहुगुणांच्या नेतृत्वाखाली चिपको आंदोलन झालं. वाटेल तशी झाडं तोडायला माणसं आली तेव्हा आदिवासी बायांनी झाडांना मिठ्या मारल्या आणि सांगितलं "अदुगर आमाला मारा मग झाडांवर वार करा." असे हे आदिवासी आणि अशी त्यांची मुलं.

अगदी अलिकडं आदिवासींची विशिष्ट चित्रकला आमच्या लक्षात आली. त्यांचा लग्नातला चौक आम्ही पाहिला होता. ज्याच्या घरी लग्न असेल त्याच्या भिंतीवर गेरु रंगानं काढलेला चौक दिसणारच. एका मोठ्या चौकोनात वरच्या कोपऱ्यात सूर्य, चंद्र, तारे, मोठं झाड, झाडावर एखादा पोपट किंवा कधीतरी एखादं माकड, कुठेतरी शिडी, फणी माळ्यावर मडकी गाडगी, मधे घोडा, घोड्यावर नवरा मुलगा व मागे करवली. वराच्या घरातल्या चौकातील घोड्याचं तोंड घराच्या दरवाज्याकडे. कारण वधू त्या घरातून बाहेर पडणार. खालच्या बाजूला वाजंत्री वाजवणारे मिरवणुकीने जात असतात. चौकाच्या चारी बाजूंना फुलांची नक्षी. वधू या चौकापुढे बसून गौरीहरासारखी मौन ठेवून पूजा करते.

गौरी यायच्या वेळी इतर समाजात काढतात तशी पावले आत येताना तर गौरी उठतात तेव्हा पावले बाहेर जाताना दिसतात.

ही सगळी कला आणखी काही वर्षात संपणार. पण ती जगवली पाहिजे. सध्या तरी ती शहरातल्या लोकांना आवडते. म्हणून आम्ही मासवणापासून लांब अंतरावर राहणाऱ्या दोन तरुणांना विचारलं. त्यांनी ती कला जोपासली होती. त्यांनी शिकवण्याचं मान्य केलं. एक योजना करून त्यासाठी अमेरिकेतील महाराष्ट्र फाउन्डेशनचं अनुदान मिळवलं. सहा महिन्यांचा प्रशिक्षणवर्ग घेतला. वीस मुलांनी नावं नोंदवली. शेवटपर्यंत दहा टिकली. त्यांनी प्रशिक्षण वर्ग पुरा केला.

या मुलांना इतकं सहजगत्या कलेचा हात कसा? कागद किंवा कापड पुढं घेतलं की ते चित्र पाहून त्याप्रमाणे सफाईदार गोलाकार रेघा काढू शकतात. त्यांचा ब्रश म्हणजे बांबूची एक कापटी. त्याचे टोक दाताखाली चावून ब्रश तयार करतात. त्यांच्या पद्धतीप्रमाणे तांदूळ भिजवून ते खलून अगदी मुलायम असं प्रीठ करायचं. तोच रंग मग गेरु रंगाच्या पार्श्वभूमीवर पांढऱ्या रंगानं चित्र काढायचं. आम्ही त्यांचा ब्रश तसाच ठेवला. रंग मात्र कॅमलिनचे दिले. सहा महिन्यानंतर मुंबईला सावरसभागृहात या चित्रांचं प्रदर्शन भरवलं. चित्राबरोबर मातीच्या भांड्यांवर चित्र, बांबूची पेनहोल्डर्स वगैरे करून त्यावर चित्रकला. कापडावर चित्रे, बांबूच्या चटयांवर चित्रे - अशा सर्व प्रकारच्या चित्रकलेचं प्रदर्शन पाच दिवस चाललं. पुष्कळ लोकांनी पाहिलं. चाळीस हजाराच्या आसपास विक्री झाली. या कामी संस्थेचे श्री. हसे यांनी खूप मेहनत घेतली. व मुंबईच्या साम्यकुल संस्थेनं खूप मदत केली. श्रम केले. तीन मुलगे व तीन मुली अशांनी पाळीपाळीने तिथं बसून चित्राचं प्रत्यक्ष निदर्शन केलं.

हे प्रदर्शन नंतर समाज कल्याण खात्याच्या मागणी वरून दिल्लीत आदिवासी महिला मेळाव्यामधे नेलं. तिथं विक्री फार झाली नाही पण आदिवासी मुलींना दिल्लीला आल्याचा आनंद मिळाला. सोनिया गांधी, राष्ट्रपतींच्या पत्नी यांच्यासारख्या मोठ्यांचे हस्तांदोलन मिळाले. आणि विशेष म्हणजे तिथल्या तरुण मुलींनी आपल्या दुपट्ट्यावर, आपल्या खमीसवर चित्रे काढून घेतली. शेवटी रेशमी साड्या पण आल्या आणि त्यावरही या चित्रकलेची मागणी. एकेक साडी चितारण्यासाठी दोन दोन मुली वीस दिवस बसल्या तेव्हा काम पुरं झालं. प्रमिलाताई दंडवत्यांच्या मार्फत साड्या येतच असतात. तीनचार मुलींना त्यावर भरपूर काम मिळत आहे. अशी ही आदिवासी मुलं, बाया. जंगलकुशीत राहणारी, निसर्गावर प्रेम करणारी, सर्व कला जोपासणारी आणि त्याबरोबरच प्रामाणिकपणा, सचोटी हे त्यांचे गुण टिकणारी आणि स्वाभिमान जपणारी.

आम्ही या मुलांना शिकवण्यासाठी इथं आलो. पण आता वाटतं त्यांच्याकडूनही आम्ही खूप काहीतरी शिकावं असं त्यांचं जीवन आहे.

◇◇◇

(भाग -१)

# मुंबईतले आदिवासी

## कायदेशीर वंशच्छेद

### रा. वि. भुस्कुटे

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, आरे दूध वसाहत, एस. आर. पी. छावणी आणि सिने नगरी असलेला हा पूर्वीच्या ठाणे जिल्ह्याचा भूप्रदेश डोंगराळ आणि जंगलाचा आहे. तेथे पिढ्यान् पिढ्याची आदिवासींची वस्ती होती, आणि अजूनही आहे. वारली, कोकणा, ठाकूर मल्हार कोळी, कातकरी या जमातीचे हे आदिवासी आहेत. या भूप्रदेशात साधारणतः २५/३० हजार आदिवासी सुमारे ५५/६० आदिवासी पाड्यांतून वास्तव्य करून आहेत. जंगलात शिकार करणे; मोकळ्या, कमी उतार असलेल्या जागेत शेती करणे; गुरे, मेंढ्या बकऱ्या, कोंबड्या पाळणे; औषधी वनस्पती, पाने, फळे, फुले, कंदमुळे, मध वगैरे जंगलातील दुय्यम उत्पादने गोळा करणे; ती वापरणे व त्यांची विक्री करणे; फावल्या वेळात शेत मजुरी किंवा अन्य मजुरी करून आपला उदरनिर्वाह हे करत आले आहेत. घनदाट जंगले आणि उंच डोंगराच्या रांगांमुळे मुंबईची फुफ्फुसे म्हणून हा भाग ओळखला जातो.

***सालसेट इस्टेट मालक करोडपती झाले***

सालसेट इस्टेट म्हणून संबोधल्या जाणाऱ्या खोती इनामामध्ये बहुधा ही सर्व गावे, त्यातील जमिनी समाविष्ट आहेत. ठाणे तालुक्यातील सालशेत बेटातील खोतांनी कायम ठरवून दिलेल्या भाड्याच्या रकमेने आणि सामान्यतः निश्चित अनुदानाने या जमिनी धारण केलेल्या होत्या. मात्र प्रत्येक प्रकरणातील धारणा पद्धतीचे स्वरूप करारातील शर्तींवर अवलंबून होते. शेती क्षेत्रातील मध्यस्थ नाहीसे करण्याच्या धोरणाप्रमाणे सालसेट इस्टेट (लँड रेव्हीन्यू एक्झायशन ॲबालिशन) कायदा १९५१ साली करण्यात आला. या कायद्याने सालसेट इस्टेट धारकांना जमीन महसूलातून दिलेल्या सुटीच्या स्वरूपातील अनुदान बंद करण्यात आले. म्हणजे जमिनीचा पूर्ण धारा या कायद्याप्रमाणे वसूल करण्यात येऊ लागला. परंतु या कायद्याने या इस्टेटीमधील प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यांना कोणतेही खास हक्क देण्यात आले नाहीत. तथापी या जमिनीतील भू–धारकांना, कुळांना जमीन सुधार कायद्याच्या तरतुदी मात्र लागू करण्यात आल्या होत्या आणि अजूनही आहेत. परंतु सालसेट इस्टेटीच्या मालकांनी त्यांच्या जमिनी स्वतः कधीच कसल्या नाहीत. बहुधा आदिवासी भंडारी, आग्री समाजातील कुळांकडून कसून घेतल्या. त्यांच्याकडून रॅक रेंट (भरमसाठ खंड) वसूल केला परंतु कोकणातील अन्य चाणाक्ष खोतांप्रमाणे जमिनीच्या हक्कपत्रकात जमीन प्रत्यक्ष कसणाऱ्या कुळांची नोंद होऊ दिली नाही. तसेच ज्या थोड्या जागृत आदिवासी कुळांनी कूळ नोंद करून घेतली होती त्या कूळ नोंदी महसूल खात्याचे अधिकारी तलाठी, मंडळ निरीक्षक, तहसिलदार आणि प्रांत यांच्या सहाय्याने बहुधा बेकायदेशीरपणे कमी करून घेतल्यानंतर पोलीसांच्या साह्याने या आदिवासीना दम देऊन, अटकेचे नाटक करून, प्रसंगी मारपीट करून हुसकावून लावले आणि सालसेट जमीन धारकीचा करोडपती होण्याचा मार्ग खुला झाला.

### जमीन सुधारणा कायद्यांचा मुंबई परिसरात धुव्वा उडविण्यात आला

मुंबईचा विस्तार झपाट्याने चहुबाजूंनी होत राहिला. पूर्वी ठाणे जिल्ह्यात समाविष्ट असलेले बोरीवली, अंधेरी इत्यादी तालुक्यांचा स्वतंत्र मुंबई उपनगर जिल्हा स्थापन करण्यात आला. या परिसरातील जमिनीच्या किंमती भूमिती श्रेणीने वाढू लागल्या. तेव्हा कूळ कायदा, शेतजमीन कमाल जमीन धारणा कायदा, आदिवासींना त्यांच्या हस्तांतरीत जमिनी परत देण्याचे कायदे यांच्या अंमलबजावणीमध्ये महसूल खात्याला अजिबात उत्साह राहिला नाही. उलट या कायद्यातून पळवाट काढून देण्यामध्ये बहुतेक सर्व महसूल अधिकाऱ्यांनी विशेष स्वारस्य दाखविले. त्यांनी सालसेट इस्टेट मालकांना याबाबतीत मोलाचे साह्य केले. त्यांची ही लोकसेवा (?) तशी त्यांना फायदेशीरही ठरली.

### आदिवासींची शेते आणि वस्त्या वन म्हणून जाहीर करण्यात आल्या

जंगलाखालील क्षेत्र वाढविण्याच्या भारत सरकारच्या धोरणाप्रमाणे महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ चे कलम ३ प्रमाणे सालसेट इस्टेटदारांच्या काही जमिनी खाजगी वन म्हणून शासनाकडे निहीत करण्यात आल्या. परंतु ज्या जमिनीत तेथील आदिवासी शेती करत होते किंवा ज्या जागांतून त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या वस्त्या (पाडे) आहेत त्या सर्व जागांना या कायद्याच्या तरतुदी वस्तुतः लागू होत नाहीत. (कलम ३ चे पोटकलम ३) परंतु आदिवासींची असंख्य शेते आणि त्यांच्या सुमारे दोन डझन वस्त्या बिनदिक्कतपणे अन्यायाने वन-जमीन म्हणून जाहीर करण्यात आल्या. शासनाच्या महसूल आणि वन या दोन्ही खात्यांनी एकमेकांना यामध्ये साथ दिली आहे. आदिवासींना कायद्याची अजिबात माहिती नाही. त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव नाही. ते संघटित नाहीत. निवडणुकीचे राजकारण करणाऱ्या कोणत्याही राजकीय पक्षाला आदिवासींच्या मूलभूत प्रश्नांमध्ये आस्था नाही. तेव्हा या परिस्थितीमध्ये महाराष्ट्र शासनाचा हा उघड उघड अन्याय वज्रलेप झाला आहे.

### भूमी संपादन आणि आदिवासी पुनर्वसनाचे नाटक

अंधेरी, गोरेगांव, जोगेश्वरी जवळच्या परिसरातील सालसेट इस्टेटीपैकी मोठ्या जमिनी शासनाने संपादन केल्या. आरे दूध प्रकल्प उभारण्याच्या भव्य दिव्य हेतुसाठी हे भूसंपादन करण्यात आले. या जमिनींची भरपाई अर्थातच बिगर आदिवासी सालसेट इस्टेट धारकांना देण्यात आली. प्रत्यक्षात आदिवासीकडे जमीन कब्जा होता. त्यांची तेथे शेते होती, घरे होती. संपादित जागा मोकळी करून घेण्यासाठी त्यांना हुसकावणे भाग होते. मग लांब पालघर तालुक्यात जंगलात आणि डोंगरात जागा देऊन त्यांच्या पुनर्वसनाची योजना आखण्यात आली. तेथे काही आदिवासींना नेण्यात आले. परंतु तेथे उदरनिर्वाहाचे पुरेसे साधन नव्हते. अन्य अत्यावश्यक सुविधा नव्हत्या. तेव्हा ट्रकमध्ये भरून नेलेली सर्व आदिवासी कुटुंबे पुन्हा आपल्या मायभूमीत त्यांच्या ओळखीच्या डोंगराच्या कुशीत परतली. शासनाचा पुनर्वसनाचा हा प्रयत्न पुरता फसला. हे एक मोठे नाटक झाले. शासनाने संपादन केलेल्या या जागेत आरे दूध वसाहत, एस.आर.पी. छावणी आणि सिने नगरी आहे. तसेच या विस्तृत भू-प्रदेशात आदिवासींचे पाडे आहेत. तेथे आदिवासी पूर्वीप्रमाणेच शेती करून मजुरी करून हंगामी नोकऱ्या करून गुजराण करत आहेत. या संपादन केलेल्या जागेतून आदिवासींना केव्हा हुसकावण्यात येईल याचा मात्र भरवसा राहिलेला नाही. हे सर्व आदिवासी अस्थिरतेचे जीवन कंठत आहेत.

***संजय गांधी राष्ट्रीय उद्यान***
***वाघांना अभय - आदिवासींचे निर्मूलन***

सालसेट इस्टेटींपैकी ज्या जमिनी आदिवासींची शेते आणि वस्त्यांसह खाजगी वन म्हणून जाहीर करण्यात आल्या होत्या तेथे वन्य जीवन संरक्षणासाठी वन्य जीव (सुरक्षा) अधिनियम १९७२ च्या कायद्यानुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यान निर्माण करण्यात आले. हे वाघांचे अभयारण्य आहे. या कायद्याच्या कलम १८(१) प्रमाणे हा भू-प्रदेश अभयारण्य म्हणून जाहीर करण्यात आला. पिढ्यान्‌पिढ्या शेकडो वर्षे या भागात शेती करणाऱ्या जवळच पाड्यांवर राहणाऱ्या, हजारो आदिवासींना त्यांचे म्हणणे मांडण्याची, हरकत घेण्याची, स्वतःचे विविध हक्क सांगण्याची संधी न देता, त्यांना अंधारात ठेवून हे सर्व करण्यात आले आहे. या उद्यानात वाघांना अभय देण्यात आले आहे. मुंबईमध्ये राहणाऱ्या लाखो लोकांच्या करमणुकीसाठी, सहलीसाठी, मौजमजेसाठी एक आदर्श उद्यान येथे उभारण्यात आले आहे. परंतु वन जीव (सुरक्षा) अधिनियम १९७२ च्या तरतुदी लागू झाल्यामुळे स्थानिक आदिवासींना अभयारण्यात -

* त्यांची पारंपरिक शस्त्रे म्हणजे भाले, धनुष्यबाण वगैरे वाळगण्यास बंदी आहे.
* राष्ट्रीय उद्यानात किंवा आसपास जीवन जगणाऱ्यांना स्वतःची झोपडी किंवा परंपरागत केंद्राची जागा बांधण्यासाठी किंवा दुरुस्तीसाठी जंगलातून लाकूड आणता येणार नाही.
* जंगलातून वनौषधीसाठी लागणाऱ्या साली, मुळे, पाने, फळे इत्यादी घेण्यास बंदी आहे.
* रोजच्या जळणासाठी जंगलातून जळाऊ लाकूड फाटा आणण्यास बंदी आहे.
* सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाळीव जनावरे, गाई, म्हशी, बैल, शेळ्या, मेंढ्या, डुकरे वगैरेंना अभयारण्यात (राष्ट्रीय उद्यानात) चारण्यास बंदी आहे.

थोडक्यात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील हजारो आदिवासींचे वास्तव्य, तेथील त्यांचे जगणे महामुष्किल करण्यात आले आहे. तेथील त्यांचे राहणे व जगणे बेकायदेशीर असल्याची पदोपदी टोचणी त्यांचे मागे आहे. उद्यानातील वन्य प्राणी म्हणजे २५/३० वाघांना अभय देण्यासाठी १५/२० हजार आदिवासींचे जीवन क्रूरपणे उद्‌ध्वस्त करण्यात येत आहे. अमेरिकेत ज्या प्रमाणे रेड इंडियन्स या मूळच्या रहिवाशांची सर्रास कत्तल करण्यात आली तशी आदिवासींची कत्तल करून त्यांच्याकडील पूर्वापार संसाधने आपण स्वीकारलेल्या घटनेनुसार हिसकावून घेता येत नाहीत. तेव्हा मुंबई परिसरातील आदिवासींचा जणू कायदेशीर मार्गाने वंशच्छेद करण्यात येत आहे. आदिवासींच्या मानवी हक्कांचे हे उल्लंघन आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

***सावधान! आदिवासींसाठी कोंडवाडे तयार होणार !***

कायद्याचा बडगा दाखवून, दम देऊन, आमिष दाखवून, गोड गोड बोलून, भूलथापा देऊन, विकासाची स्वप्ने रंगवून कोणत्याही मार्गाने संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात शेकडो वर्षे वास्तव्य करणाऱ्या आदिवासींना जंगलातून, डोंगरातून हुसकावून लावण्याचे नेटाचे प्रयत्न वनखात्याने सुरू केले आहेत. कायद्याचा बडगा वारंवार उगारून आदिवासीना हैराण करण्याच्या तंत्राचा पद्धतशीर वापर सुरू झाला आहे. एका बाजूला आदिवासींना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणाऱ्या; त्यांना कायद्याची, विकास योजनांची माहिती देणाऱ्या; राष्ट्रीय उद्यानातील स्थानिक आदिवासींचे आंदोलन संघटित करणाऱ्या लढाऊ कार्यकर्त्यांवर वनखात्याच्या आणि पोलीस



4395.4R

खात्याच्या अधिकाऱ्यांचा खास रोष आहे. नक्षलवादी ठरवून त्यांना चिरडून टाकण्याच्या प्रयत्नात ते आहेत. तर दुसऱ्या बाजूला मुंबईमधले भोळे ( ?) पर्यावरणवादी आणि सोशल वर्कचा ठेका घेतलेली कॉलेजे यांच्या साह्याने या आदिवासींसाठी १० x १० खोल्या असलेली अलिशान वस्तीस्थाने - म्हणजे आदिवासींच्या दृष्टीने कोंडवडे - उभारण्याची योजना आखली जात आहे. एकत्रित वस्ती असेल तर वीज. पाणी, शाळा, रस्ते वगैरे सुविधा पुरवून विकास साधता येईल अशा गोंडस आवरणाखाली हे करण्याचे घाटत आहे. हजारो आदिवासींच्या उदरनिर्वाहाचा, त्यांच्या संस्कृतीचा, त्यांच्या जीवन पद्धतीचा विचार सोयीस्करपणे नजरेआड करण्यात येत आहे. एक प्रकारे ही योजना स्तुत्य आहे. कारण राष्ट्रीय उद्यानात अभय दिलेल्या वाघांना पाहण्यासाठी जे हजारो लोक येतील, परदेशी पाहुणे येतील त्यांना याच जंगलात पूर्वी मुक्तपणे संचार आणि वास्तव्य करणाऱ्या काही दोन पायांच्या आदिवासींचे (ढोरांचे) आधुनिक कोंडवाड्यातील नमुने दाखविणे संयुक्तिक ठरणार आहे. कोणताही स्वाभिमानी आदिवासी या योजनेला मान्यता देईल असे वाटत नाही.

# (फॉर्म ४, नियम ८ नुसार निवेदन)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे-४११ ००७. |
| २. | प्रकाशन काल | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक व संपादक | : | रामचंद्र केशव मुटाटकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे-७. |
| ४. | स्वामित्व | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद<br>६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |

मी. रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

३१ जानेवारी १९९४

**रा. के. मुटाटकर**

***- प्रकाशक***

# राष्ट्रीय पर्यावरण जागरुकता अभियान

प्रा. गो. कृ. पालकर

*भारत सरकारद्वारा अनुदानित आणि धरमपेठ कला, वाणिज्य व म. पा. देव स्मृती विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाद्वारे आयोजित सातपुड्याच्या पंचक्रोशीतील मेळघाट विभागाचा समाजशास्त्र व मानवशास्त्रदृष्ट्या अहवाल.*

सातपुड्याच्या कुशीत असलेल्या मेळघाट प्रदेशात घनदाट अरण्य असून त्यात वनविभागातर्फे व्याघ्र प्रकल्प राबविला जात आहे. मेळघाटचा जवळजवळ २/३ जंगली भाग प्रसिद्ध व्याघ्र प्रकल्पाने व्याप्त आहे. या प्रकल्पात काही वनखेडी व वनग्राम आहेत. या वनग्रामातून व वनखेड्यातून राहणाऱ्या वनवासींना जंगलचे राजे व निसर्गपुत्र म्हटले जाते. यांची वस्ती जंगलात, दऱ्याखोऱ्यात व पाणवठ्याच्या जवळपास असते. ते जंगलाच्या कुशीत जन्म घेतात व जंगलातच त्यांचा मृत्यू होतो. जंगल हेच त्यांचे कार्यक्षेत्र. बाहेरच्या जगाशी त्यांचा सर्वसामान्यतः संबंध नसतो. वनातील इतर मानवांप्रमाणे वृक्षवल्ली हेच त्यांचे सखे व सोयरे असतात. आदिवासींचा इतिहास लक्षात घेतल्यास आदिवासी समाज टोळ्या टोळ्याने राहतो. मेळघाट परिसरातील ग्रामातून मुख्यत्वेकरून सर्वात अधिक कोरकू, गोंड व गवळी जमाती राहतात. या तिन्ही जमातींची जीवनपद्धती - पोषाख, खानपान, सण, उत्सव, रहन-सहन, दाग-दागिने - थोड्याबहुत प्रमाणात भिन्न असली तरी सर्वसामान्यतः मिळती जुळती आहे. परंतु अलीकडे या समाजात बरेच परिवर्तन झालेले आहे. आदिवासी समाजाचा सुधारलेल्या समाजाशी जो थोड्याबहुत प्रमाणात संपर्क येतो आहे त्यामुळे त्यांची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक प्रगती होत असलेली आढळत असली तरी आदिवासी समाजाची सुधारलेल्या शहरी समाजाशी तुलना केल्यास असे आढळते की आदिवासी समाज सुधारलेल्या शहरी समाजापेक्षा अजूनही सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रात बराच मागासलेला आहे. त्यामुळे आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध कल्याणकारी योजना राबवून आदिवासी हा समाजाचा एक समर्थ घटक घडविणे आवश्यक आहे.

ज्या ठिकाणी भरपूर पाऊस पडतो त्या या वनवासी ग्रामांत पिण्याच्या पाण्याची योग्य सोय नाही. या भागातून खंडू, खापरा, गडगा, डोलार, सिपना ह्या नद्या व असंख्य नाले वाहतात. परंतु यापैकी या भागातील मोठी आणि प्रमुख नदी सिपना सोडल्यास बाकी सर्व एप्रिलच्या महिन्यात कोरड्या शुष्क आढळतात. त्याचप्रमाणे ज्या ग्रामात विहिरी व हापसींची व्यवस्था करण्यात आलेली आहे त्या विहिरी कोरड्या असून बऱ्याचशा ठिकाणी हापसींना पाणी नाही, अगर त्या बेकार पडल्या आहेत. त्यामुळे या भागातील बऱ्याचशा वनवासी लोकांना १-२ किलोमीटर अंतरावरून पाणी आणावे लागते. आदिवासी दररोज स्नान करीत नाहीत अगर दररोज कपडे धूत नाहीत. तरीपण त्यांना हात, पाय, तोंड धुण्याकरिता, पिण्याकरिता, वेळप्रसंगी कपडे धुण्याकरिता व त्यांनी पाळलेल्या गुरांना

पाजण्याकरिता मुबलक पाणी जवळपास मिळत नाही. ते त्यांना बरेच लांबून आणावे लागते.

आदिवासींचा मुख्य व्यवसाय शिकार होता. परंतु आता शिकारीवर बंदी असल्यामुळे शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय झालेला असून जंगलाच्या उतरणीवर व काही सपाट प्रदेशात नांगरणी-वखरणी करून शेती केली जाते. या शेतीतून त्याला ज्वारी, बाजरी, कोदो, कुटकी, चना, मसूर ही प्रमुख धान्ये मिळतात. शेती वरपावसाचीच केली जाते. त्यांचे मुख्य अन्न भाकरी, भात, भाजी किंवा चटणी हेच आहे. जंगलातील मोहफुले वेचून ती भाजून खातात. मोहाची स्वतः तयार केलेली दारू हे त्यांचे आवडते पेय. तिचा सर्वांकरवी सर्रास वापर केला जातो. शुद्धीकरण, मृतकसंस्कार, देवधर्म, पूजा, सण, उत्सव अशावेळी दारूला फार महत्त्व दिले जाते, तिचा भरपूर वापर केला जातो. काही आदिवासी कोंबड्या, बकऱ्या पाळतात. सण उत्सव व पूजेच्या प्रसंगी त्यांचा बळी देऊन त्यांचे मास शिजवून प्रसाद म्हणून खातात. गावातील गुरे चारण्याचे काम गोंड करतात. बरेचसे वनवासी मजुरी करतात.

या भागातील आदिवासी पुरुष धोतर किंवा पंचा नेसतात, अंगात बनियन किंवा शर्ट घालतात. स्त्रिया लुगडे नेसतात व अंगात पोलकी घालतात. गोंड स्त्रिया विशेष प्रसंगी डोक्यावरून शाल गुंडाळतात व नऊवारी पद्धतीची साडी नेसतात.

आदिवासी पुरुष अंगावर दागिने घालीत नाही. बोटात अंगठीसुद्धा नसते परंतु स्त्रिया मात्र मोठ्या हौसेने बाहूत वाकड्या, हातात तेड्या, मनगटावर बिगडी, गळ्यात हंसली (हंबल), कमरेत मायांगा (कमरपट्टा), हातात छन्नी, पायात वाळे, कमरेवर करदोडा, गळ्यात सरी, बाहूवर बाहुटे इत्यादी दागिने घालतात. हे दागिने चांदी, कथील अगर खुरं या धातूंचे असतात.

आदिवासींच्या स्वयंपाकाकरिता मातीची किंवा जर्मन (ॲल्युमिनियमची) भांडी वापरली जातात. गावात दुकाने नसल्यामुळे अत्यावश्यक वस्तू खरेदी करण्याकरिता जवळपासच्या मोठ्या गावात भरणाऱ्या आठवडी बाजारात त्यांना जावे लागते. मजुरी व वस्तूंची देवाण-घेवाण अगर खरेदी-विक्री इत्यादी बाबतीत अशिक्षितपणामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक व पिळवणूक होते. योग्य रस्ते नसल्यामुळे बहुतेक पायीच अगर क्वचित प्रसंगी गाडीबैलाने बाजाराकरिता जवळपासच्या हरिसाल, धारणी, सेमाडोह सारख्या गावी त्यांना जावे लागते.

व्यसनाधीनता मद्यप्राशन, तंबाखू, गांजा, बिड्या पिणे हे कोरकू व इतर आदिवासी यांचे वैशिष्ट्य होय.

घटांग, हरिसाल, सेमाडोह, चौराकुंड, मालू यासारख्या गावी प्राथमिक, मिडल स्कूलपर्यंत शाळा आहेत. परंतु ४ वर्गांना दोन शिक्षक व २ वर्गांना एक शिक्षक अशी येथील शाळांची अवस्था आहे. मुलांना बसण्याकरिता पुरेशी जागा नाही. आदिवासी मुलांचा शिक्षणाकडे ओढा नाही आणि त्यात वरील परिस्थितीची भर त्यामुळे शिक्षणाला अत्यल्प प्रतिसाद. म्हणून शिक्षणाचे प्रमाण आदिवासी क्षेत्रात फारच कमी आहे. काही आदिवासी कोरकू, गोंड व गवळी यांची मुले शिक्षण घेऊन नोकरीला लागली असली तरी एकंदरीत या भागात शिक्षणाबद्दल उदासीनता असलेली जाणवते. अशिक्षितपणामुळे मागासलेपणा हा कोरकू, गोंड व इतर वनवासींचा गुणधर्म आहे.

कोरकू व गोंड यांचे मुख्य सण होळी (फागुन), पोळा जिवती, दसरा, दिवाळी हे असून यावेळी ग्रामदेवता तसेच देवी व इतर देवता यांची

थाटामाटात पूजा केली जाते. यावेळी ढोल, थापटी, ढोलक, पायल, बांसुरी इत्यादी वाद्ये गाण्यावरोबर वाजविली जाऊन त्यांच्या तालावर व ठोक्यावर नृत्य स्त्री, पुरुष व मुले करतात. लग्नाचे वेळी सुद्धा या वाद्यांचा उपयोग गाणी व नृत्य चालू असताना केला जातो. लग्नात मुलीचे वय जवळपास १२ ते १५ वर्षे असते तर मुलाचे वय १५ ते २० वर्षांचे असते. कोरकू व गोंड जमातीत वराला मुलीचे वडिलांस वधू-मूल्य द्यावे लागते. ते कधी पैशाचे स्वरूपात तर कधी पशू (गाय, बैल, बकरी) यांचे किंवा धान्याचे स्वरूपात दिले जाते. लग्न-सोहळा जवळजवळ ३ ते ४ दिवस चालतो. लग्न प्रसंगात गोड पदार्थापेक्षा कोंबडी अगर बकऱ्याचे मांस, भात व त्यासोवत भरपूर प्रमाणात दारू यांचा पाहुणचार दिला जातो. याप्रमाणेच गावभोजनाचे प्रसंग वरेचदा येतात.

आदिवासी लोक 'गाव बांधणी' करताना मंत्रतंत्राचे निनादात गावाच्यासभोवती काठीचे सहाय्याने गोलाकार रेषा पाडतात. त्यामुळे हिंस्र श्वापदे त्या रेषेच्या आत येऊन गावातील जनतेला व जनावरांना त्रास देत नाहीत असा गावकऱ्यांचा विश्वास आहे. परंतु हिंस्र श्वापदांनी रात्री गावात शिरून गुरे पळवून नेल्याची व माणसांना सुद्धा त्रास दिल्याची व कधीकधी मारल्याची सुद्धा उदाहरणे आहेत.

रोगनिवारणाकरिता कोरकू, गोंड, गवळी व इतर लोक जंगलातील वनस्पती, झाडांची साल, मुळे, जंगली हाडे व विशिष्ट ठिकाणचे मांस यांचा उपयोग करतात. शतावरी, वेल, पुनर्जवा, रानकेळी, पुष्पपर्णी, भुमका, डुकरकंद, लेपाटी, डोडा, कपाळफोडी, रानहळद, दुधी, वचनाग, निंव, वेकाल, चिल्हाटी, बिवा, हत्तीकंद, हाडजोडी, बांबू खडा, मुरडशेंग इत्यादी वृक्ष व वनस्पती यांचा विविध प्रकारच्या रोगनिवारणाकरिता उपयोग केला जातो. एकंदरीत जंगली प्राणी, वनस्पती व झाडे ही वनवासी लोकांना आरोग्याच्या दृष्टीने सहाय्यभूत व जीवदान देणारी आहेत हे स्पष्ट होते. वहुतेक सर्व प्रकारचे मानवी रोग वनस्पती, वृक्ष, वन्य प्राणी, पक्षी यांचे सहाय्याने वरे केले जातात. एवढेच नव्हे तर जंगली प्राण्यांची विष्टा सुद्धा विविध प्रकारचे मानवी रोग बाह्योपचाराने दुरुस्त करण्याकरिता उपयोगात आणली जाते.

कोरकू, गोंड व इतर वनवासी लोकांच्या घरांची रचना पूर्व पश्चिम दिशेने दोन-दोनच्या सरळ रांगात असते. याचे कारण पूर्व-पश्चिमचा प्रकाश व हवा गावकऱ्यांना भरपूर प्रमाणात मिळावी व त्यांचे आरोग्य नैसर्गिकरीत्या चांगले रहावे हा त्यामागचा दृष्टिकोन आहे. आदिवासींचे गाव स्वच्छ आढळते. ते पाळीव प्राणी घराच्या मागच्या वाजूला बांधतात व दर्शनी भाग मोकळा व स्वच्छ ठेवतात.

मेळघाटच्या जंगलात विवटे, वाघ, चित्ते, हरीण, सांवर, चौसिंगा, वारासिंगा, डुक्कर, गवा, नीलगाय, वनगाय, कोल्हे, रानमांजर, घोरपड, रानकुत्रे, अस्वल, भेरा, चकाचोर साप, रानकोंबडा, ब्रादुगणी खार, मोर, वगळे, निरनिराळ्या रंगाचे सरडे, ससे, तडस, घार, गरूड आदी अनेक जंगली श्वापदे व पक्षी आढळतात. जंगलात मुंग्यांची दोन प्रकारची घरे दिसतात. झाडावर मातीची उलट्या फणसाएवढी सुवक तसेच जमिनीत खाली व वर चक्रव्यूहासारखा पृष्ठभागावर आकार असलेली वरीच घरे आहेत. जमिनीवरील घरांची रचना मोठी वैशिष्ट्यपूर्ण आकर्षक व जमिनीच्या आतील भागात उजेड येण्याचे दृष्टीने शास्त्रीय पद्धतीची रचना असलेली आढळते. ही मातीची घरटी ४००० वर्षांपासून केली जात आहेत.



1395.5A

याप्रमाणे प्राणी, वनस्पती, कीटकांचा संचय, प्राणी व वनस्पतींची विविधता, त्यांची विपुलता म्हणजे जंगल म्हणता येईल. हे जंगल किंवा वन पर्यावरणाचे दृष्टीने प्राणीमात्र आणि मानव यांना आवश्यक व अतिशय उपयुक्त असेच आहे. जंगलातील सरडे सुद्धा विविध रंगाचे पट्टे असलेले व आत्मसंरक्षणाचे दृष्टीने रंगसंगती असलेले आढळतात.

मेळघाटच्या जंगलात लेपाटी, डोडा, तिवडी, तेरडी, चमकोरा, जंगली तीळ, भारंगी, अर्जुन, जंगली कापूस, तेंदू हिरडा, मोह, पळस, चार, कळंव, येण (साजड), आवळा, बांबू, लेंडिया, धावडा, आंबा, इत्यादी प्रकारच्या झाडांबरोबरच सर्वात जास्त प्रमाणात म्हणजे ७५ ते ८५ टक्के वृक्ष सागाचे आहेत. ही झाडे अतिशय मौल्यवान, मजबूत व सुवक म्हणून इमारती लाकूड देणारी आहेत. वाघ शिकार खाल्ल्यानंतर अगर इतर वेळी आपली नखे मोहा, मोइज या झाडांच्या ४ पडिग्री असलेल्या बुंध्यांनी साफ करतो.

सेमाडोहला एक सागवान झाड ९० वर्षांचे असून त्याची किंमत साठ हजार रुपये एवढी आहे. त्याची उंची २३ मीटर आहे. अशी अनेक मौल्यवान सागवानाची झाडे मेळघाटच्या जंगलात आहेत. आम्हास असे सांगण्यात आले की कपड्याचे अभावी प्रत्येक आदिवासी कुटुंब थंडीपासून संरक्षण प्राप्त करण्याकरिता तसेच हिंस्र श्वापदापासून होणारा त्रास टाळण्याकरिता दररोज रात्री एक सागवानाचे किंवा इतर कोणते तरी झाड जाळते. अशा प्रकारे अनेक आदिवासी गावात दररोज कोट्यावधी रुपयांची असंख्य सागवान व इतर झाडे मोडून जाळली जातात. ही अहितकारक आणि राष्ट्रीयदृष्ट्या विघातक, अनावश्यक जंगलतोड थांबविणे आवश्यक आहे. त्याकरिता आदिवासींना आवश्यक तेवढा माफक किंमतीत वस्त्र पुरवठा करून राष्ट्राला आर्थिक संकटापासून तसेच पर्यावरणात होणाऱ्या असमतोलापासून वाचवावे. त्याचबरोबर वनवासी लोकांना जाणीव देऊन त्यांना या समाजविघातक व राष्ट्रविरोधी जंगलतोड व वृक्षांच्या दुरुपयोगापासून पर्यायी व्यवस्था करून परावृत्त करावे अशी सूचना कराविशी वाटते. त्याचबरोबर वनवासी क्षेत्रात कार्य करणाऱ्या समाज सेवकांना सुद्धा याबद्दलच्या जाणीवा दिल्यास ते सुद्धा वनवासी लोकांना शिक्षित करून, त्यांना जंगलातील वृक्ष, वेली व मानव यांचे महत्त्व पटवून देऊन राष्ट्रीय संपत्तीची होणारी हानी व पर्यावरणात होणाऱ्या असमतोलापासून समाजाला व देशाला वाचवू शकतील. आम्ही सुद्धा आमच्या अभियानाचे वेळी ज्या ज्या गावकऱ्यांशी भेट व बोलणी झाली तेव्हा त्यांना याबद्दलचे महत्त्व पटवून देऊन या आत्मघातकी कृत्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु एवढ्यानेच काम होणार नसून सातत्याने तसा प्रयत्न होणे आवश्यक आहे. कारण निसर्ग नद्या, नाले, जंगल, पशू, पक्षी, वृक्ष, मानव यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. हे सर्व एकमेकांना पूरक व परस्परावलंबी आहेत. त्यामुळे त्यांचेतील समतोल ठेवण्याचे कार्य मुख्यत्वेकरून मानवालाच करावयाचे आहे. मग तो वनवासी असो अगर शहरी सुखासीन, सुशिक्षित व मला काय त्याचे असे म्हणणारा असो. हे एक जाणीव जागृतीचे राष्ट्रीय कर्तव्य म्हणूनच कार्य करावे लागणार आहे. ते जर झाले नाही तर आत्मघातकी मानव आपलाच विनाश घडवून आणल्याशिवाय राहणार नाही. त्याशिवाय तो अटळ राहील. त्यामुळे 'मानवाने केला मानवाचा घात' असे म्हणण्याची पाळी आपल्यावर येऊ नये. या संकटातून मार्ग काढण्याकरिता संतांनी 'वृक्ष, वेली आम्हां सोयरे धायरे' असे सांगून वृक्ष व वेलींचे नाते जोडले आहे. छत्रपती शिवाजी



4395

महाराजांनीसुद्धा आपल्या आज्ञापत्रात जंगलातील वृक्ष, वेलींचे महत्त्व प्रतिपादन करून जंगलतोड थांबविण्याचे आवाहन केलेले आहे.

मेळघाटच्या जंगलात मानव तसेच मानवेतर प्राणी यांना जीवदान देणारी वनस्पती, वृक्ष व इतर खनिज संपत्ती विपुल प्रमाणात आहे. त्यावर संशोधन होऊन तिचा योग्य प्रकारे उपयोग केला गेला तर भारतातील हिमालय, विंध्य, सातपुडा, दक्षिणेत निलगिरी, कोंकण पट्टीतील पश्चिम घाट, आसामच्या टेकड्या इत्यादी जंगली भागावरोबर याही परिसराचा समतोल न विघडविता छोटेमोठे उद्योग निर्माण करून भारतातील मानव व मानवेतर प्राण्यांचेच नव्हे तर विश्वातील यच्चयावत प्राणीमात्रांचे कल्याण व हित साधण्याचे श्रेय हिंदुस्थानला मिळू शकेल. कारण संपूर्ण विश्वाला पुरवू शकेल एवढी वनौषधी हिंदुस्थानातील विविध ठिकाणच्या जंगलात उपलब्ध आहे. त्याकरिता संशोधन, कल्पकता व अथक परिश्रमाची नितांत आवश्यकता आहे, नव्हे ती काळाची गरज आहे.

शिक्षणाचा प्रचार व प्रसार विशेष झालेला नसल्यामुळे मेळघाट परिसरातील वनवासींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झालेली नाही. शैक्षणिक प्रगती मर्यादित असल्यामुळे वनवासी बांधवांचे अज्ञान अजूनही दूर झालेले नाही. त्यामुळे व्यापारी वर्ग, सावकार आणि इतर वर्गाकडून त्यांची आर्थिक पिळवणूक मोठ्या प्रमाणावर होत असते. शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले असल्यामुळे आदिवासी/वनवासी बांधवांना रोजगार प्राप्त करण्यास व स्वतंत्र आर्थिक व्यवहार करण्यास अनेक अडचणी येत आहेत.

मर्यादित गरजा हे वनवासी लोकांचे आर्थिक मागासलेपणाचे कारण दिसत नसले तरी खऱ्या अर्थाने आर्थिक मागासलेपणाचे हेच मूळ कारण आहे. आर्थिक गरजा मर्यादित असल्यामुळे गरजेपुरतेच मिळवावे व संतुष्ट रहावे अशी प्रवृत्ती वाढते. त्यामुळे उत्पन्नात वाढ करून जीवनमान वाढविण्याची प्रवृत्तीच खुंटते. ज्याप्रमाणे अनावश्यक गरजा आर्थिक समस्या निर्माण करतात त्याचप्रमाणे मर्यादित गरजा आर्थिक मागासलेपणा निर्माण करतात. वनवासी बांधवांचा आर्थिक मागासलेपणा दूर करण्यासाठी आदिवासी कल्याणकारी योजना सरकारी स्तरावर आखल्या गेल्या असल्या तरी त्यांची योग्य अंमलबजावणी होताना किंवा झालेली आढळली नाही. विविध आदिवासींकरिता कार्यान्वित केलेल्या सरकारी कल्याणकारी योजना यशस्वीरीत्या राबविल्या जाणे अत्यावश्यक आहे. त्याकरिता वनवासी समाजात जागृती व परिवर्तन घडवून आणण्यासाठी निष्ठावान व वनवासी कल्याण कार्यक्रमाशी बांधिलकी असलेले समाजसेवक, कार्यकर्ते आणि वनवासी समाजातूनच या कार्याला वाहून घेणारे नेतृत्व निर्माण होणे आवश्यक आहे. आदिवासी प्रदेश व शहरी भाग यांचा सततचा संपर्क राहण्यासाठी दळणवळणाच्या सोयी व बारमाही चालू राहणाऱ्या पक्क्या रस्त्यांची सोय झाली पाहिजे.

खाजगी क्षेत्रातील उद्योगपती व सरकार यांनी आदिवासी प्रदेशात जंगल संपत्तीवर आधारित रोजगार निर्माण करणारे छोटे छोटे उद्योग कार्यान्वित केले पाहिजेत. या छोट्या उद्योगांमुळे पर्यावरण समतोल बिघडणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक राहील. सर्वांत महत्वाचा मुद्दा म्हणजे आदिवासींच्या गरजा वाढावयास हव्यात आणि त्यांचा जीवनाकडे व विश्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. आपल्या गरजा पूर्ण करून समाजाकरिता धडपडणारा आदिवासी पुढे आला पाहिजे.

# मानवशास्त्रज्ञांच्या वाटचालीतील मित्रत्व व दुरस्थता

## सुषमा सोनक

*मानवशास्त्राची 'नजर'*

'स्ट्रेंजर अँड द फ्रेंड : द वे ऑफ अॅन अॅन्थ्रॉपॉलॉजिस्ट' या पुस्तकात, हॉर्टेन्स पावडरमेकर या अमेरिकन ज्यू मानवशास्त्रज्ञेने 'मित्र व दुरस्थ' या मानवशास्त्रज्ञांच्या परस्परविरुद्ध भासणाऱ्या भूमिकांमागील गृहितांचा तपास घेताना आपल्या फिल्डवर्क (क्षेत्रकामातील) अनुभव 'केस स्टडीज' म्हणून सादर केले आहेत. क्षेत्रकाम ही मानवशास्त्राची विशिष्ट अभ्यास पद्धती; मानवशास्त्राची नजरच जणू या अभ्यास पद्धतीतून व्यक्त होते. या अभ्यासपद्धतीची निर्मिती आणि मानवशास्त्राचा विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू. पावडरमेकरने त्यावर झोत टाकलेला आहे.

*'एक शिस्तबद्ध व सहानुभूतीपूर्ण दृष्टी'*

मानवशास्त्राच्या विकासात वसाहतवादी व वसाहतवादोत्तर दृष्टिकोनांचा संघर्ष दिसून येतो. हा संघर्ष मानवशास्त्राच्या विज्ञानजड विरूद्ध मानवाधिष्टीत प्रतिमांतूनही दृगोच्चर होतो. पावडरमेकरच्या लिखाणातून दिसते ती अनेकविध राजकीय हितसंबंधातून वाट काढत दुर्लक्षित अशा आदिम समूहांकडे पाहण्याची व त्यांना समजून घेण्याची एक शिस्तबद्ध आणि सहानुभूतीपूर्ण दृष्टी. ही दृष्टी म्हणजे पश्चिमी संस्कृतीला क्षेत्रकामाने दिलेली एक अनमोल भेट आहे.

विसाव्या शतकातली दोन जागतिक महायुद्धे, जगभर वसाहतवादाविरुद्ध होत गेलेले लढे आणि औद्योगिक संस्कृतीच्या झपाट्याने होत गेलेल्या प्रगतीच्या ताण-तणावातून मानवशास्त्रात नव्या भूमिका आकारू लागल्या आणि मानवशास्त्रज्ञांची दृष्टी हळूहळू आत वळू लागली.

*मानवशास्त्राची अंतर्मुखता*

मानवशास्त्रज्ञ असणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्व आणि जीवनदृष्टीचा परिणाम कळत-नकळत त्याच्या अभ्यासप्रक्रियेवर आणि अभ्यासविषयावर होतो. यासाठी पावडरमेकरला क्षेत्रअभ्यास आणि क्षेत्रअभ्यास करणारा मानवशास्त्रज्ञ या दोहोंकडे पाहायला शोधक, शिस्तबद्ध आणि अंतर्मुख दृष्टीची गरज भासू लागली.

क्षेत्रकाम - ही दुर्गम प्रदेशात जाऊन, आदिवासींच्यात वर्षानुवर्षे राहून, त्यांच्यातीलच एक होऊन त्यांच्या जीवनपद्धतीचे सह्योगात्मक सखोल निरीक्षण करण्याची अभ्यासपद्धत म्हणून प्रथम प्रचलित झाली. याबाबत पावडरमेकरच्या लिखाणातून वसाहतवादोत्तर दृष्टीकोन उभरताना आढळून येतो. हा दृष्टीकोन मानवशास्त्रज्ञांच्या गृहितांचा ठसा त्याच्या किंवा तिच्या अभ्यास विषयावर कसा उमटवतो आहे हे अधिक बारकाईने पाहतो. दुसरे म्हणजे, मानवशास्त्रज्ञ या नव्या व्यावसायिक 'जमातीचे' 'क्षेत्रकाम' या त्याच्या जीवन पद्धतीचे आणि 'एथनॉग्राफिक मोनोग्राफ्स' (परसंस्कृतींचा साम्यक निरिक्षणात्मक अभ्यास) या त्याच्या सांस्कृतिक निर्मिती प्रक्रियेचे अध्ययन करण्याची शक्यता हा दृष्टीकोन आपल्याला उपलब्ध करून देतो.

पावडरमेकरने या पुस्तकात आपले क्षेत्रकामातील अनुभव जसेच्या तसे न मांडता अंतर्मुख होऊन आत्मविश्लेषणात्मक पद्धतीने मांडले आहेत व त्यायोगे स्वत:च्या कामावरोबरच स्वत:च्या

व्यक्तिमत्वाची ओळख करून दिली आहे आणि या दोहोंतील परस्परसंबंध हा तिचा एक अभ्यासविषय आहे.

***क्षेत्रकाम : एक अर्थपूर्ण अनुभव***

विद्यार्थीदशा नुकतीच संपल्यावर मानवशास्त्राची सुप्रतिष्ठित प्राध्यापिका म्हणून आपल्या वाटचालीत जगाच्या विविध कानाकोपऱ्यातील आणि औद्योगिक विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर असलेल्या समाजातील अगदी प्राचीन अश्मयुगीन हत्यारे वापरून गुजराण करणारी ऑस्ट्रेलिया खंडातील लेसू जमात, ते स्वतंत्र अमेरिकेतील मिसिसिपी राज्यातील गोरे-काळे शेतकरी व शेतमजूर, आफ्रिकेतील कॉपरबेल्ट वसाहतीतील खाणउद्योगात राबणारे मजूर आणि इंग्रज अधिकारी वर्ग आणि अत्याधुनिक यंत्रसामग्री वापरणाऱ्या हॉलिवूडमधील चित्रपटसृष्टीचा अभ्यास तिने केला.

तिने ज्या ज्या समूहांमध्ये काम केले तेथील तिच्या खबऱ्यांशी तिचे दृढ संबंध निर्माण झाले. विभिन्न पातळ्यांवरचे औद्योगिक आणि सांस्कृतिक मक्तेदारीचे बांध फोडून परस्परांविषयी आदर, विश्वास आणि प्रेम निर्माण होऊ शकते आणि त्याच्या बळावरच क्षेत्रकामाचा अर्थपूर्ण अनुभव उभरतो हे ती वारंवार सांगते आणि आपल्या आयुष्यातून सोदाहरण दाखवून देते.

***देवाणघेवाणीचे संबंध***

मानवशास्त्रीय निरीक्षण हे सामाजिक पोकळीत उद्‌भवूच शकत नाही. ज्या सामाजिक, सांस्कृतिक संबंधांचा ते अभ्यास करते तसे संबंध, मानवशास्त्रज्ञ व ज्या समाजाचा तो किंवा ती अभ्यास करत असते, त्यातील व्यक्तींशी प्रस्थापित झाल्याशिवाय एकही पाऊल पुढे टाकणे त्यांना शक्य नसते. एखाद्या प्रयोगशाळेतील शास्त्रीय निरीक्षण व मानवशास्त्रीय निरीक्षणाची प्रतच वेगळी आहे. सहभागाशिवाय मानवशास्त्रीय निरीक्षणाची सुरुवात होऊ शकत नाही. याबाबत आपल्या पहिल्याच क्षेत्रकामाचा अनुभव लेखिकेने सांगितला आहे.

ती आपल्या पहिल्याच क्षेत्रकामासाठी ऑस्ट्रेलिया खंडातील लेसू या जमातीत, आपल्या घरापासून, देशापासून आणि प्रगत अशा समाजापासून हजारो मैल दूर आली तेव्हा तिचे मन भयाने झाकोळून गेले. एकटेपणाच्या विकट जाणीवेने तिला झोपही लागली नाही. हळूहळू तेथील लोकांशी तिची ओळख झाली. त्यांनी तिचे स्वागत केले. तिच्या जीवात जीव आला. तिला शांत झोप आली. या अनुभवाची उब तिच्या मनात आयुष्यभर वास करून राहिली. जोवर त्यांनी तिला स्वीकारले नव्हते तोवर ती एका भयव्याकूळ अवस्थेत होती आणि त्यांनी स्वीकारल्यावर तिचे चित्त शांत झाले व तिने कामाला सुरुवात केली.

***कसोटीचा क्षण***

हळूहळू त्या २३२ माणसांच्या खेड्याने तिला आपलेसे केले व एक दिवस कसोटीचा क्षण आला. त्यांच्या वस्तीत नाचाचा कार्यक्रम ठरला होता. तिथल्या स्त्रिया तिच्या मागेच लागल्या. "तू आज आमच्याबरोबर नाचायचं" हे त्यांचं पालुपद होतं. जसजशी रात्र वाढू लागली तसतशी तिची अस्वस्थता वाढीला लागली. तिने म्हटले आहे "माझ्या डोळ्यासमोर हजारो मैल दूर असलेले माझे कुटुंबीय आले. आश्चर्य आणि अविश्वासाने ते माझ्याकडे पाहात होते. 'हॉर्टेन्स आज रानटी लोकात नाचतेय' असा अविश्वास, तुच्छता आणि तिरस्कारमिश्रीत भाव त्यांच्या डोळ्यात होता. तो मला व्याकूळ करून गेला."

***फलित***

"इकडे नाचाची लय वाढत होती. मनाने मी पुन्हा लेसूमध्ये आले. रिंगणात उतरले, फेर



395.6A

धरला आणि इतरांबरोबर पावले टाकू लागले." आणि तिने पुढे लिहिले आहे "ही पावले टाकताना मी मला विसरले..... मी इथलीच झाले... माझ्यातला हा बदल क्षणिक होता. पण मलाच तो चमकावून गेला. माझ्या दृष्टीने तो अतिशय मूल्यवान क्षण होता." सहयोगात्मक निरीक्षण पद्धतीचे एक फलित त्यात तिला आढळले. तिच्या मते एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी वा समाजाशी समरस होणे महाकठीण असले तरी अशक्य नाही. आणि जसे ते अशक्य नाही तसेच ते सदासर्वदा शक्य पण नाही. सामान्य माणसे या अनुभवातून रोज खऱ्या आयुष्यात सहजतेने जातात. मानवशास्त्रज्ञाला मात्र या मित्रत्वाच्या वा दूरत्वाच्या भूमिका जागरूकरीत्या अंगीकारून पार पाडाव्या लागतात. याकरिता मानवशास्त्रज्ञाला मित्रत्वाची भूमिका पार पाडण्यासाठी ज्या समाजात काम करायचे आहे तेथील स्वीकार आवश्यक आहे तसेच स्वतःहून त्या समाजात राहून दुरस्थाची भूमिका निर्माण करून निभावण्याची जबाबदारी स्वतःवर आहे. पावडरमेकरचे लिखाण वाचताना जाणवते की मानवी अनुभवाचे नित्याचे पदर मानवशास्त्राच्या आधारे ती उलगडू पाहते आहे.

***मानवतावादी अधिष्ठान***

मानवशास्त्र सांगते की जगात हजारो संस्कृत्या आहेत. यापैकी कुठलीच संस्कृती श्रेष्ट कनिष्टतेच्या आंधळ्या मापाने मोजली जाऊ शकत नाही. मानवप्राण्याने जगण्याचे हजारो प्रकार-प्रघात शोधून काढले आहेत. त्यापैकी अनेक कालौघात नामशेष झालेत तर अनेकांची जाणीवपूर्वक नाकेबंदी करण्यात आली. वसाहतवाद हे या दडपणुकीचे एक मुख्य उदाहरण. हिटलरप्रणित वंशवादाचा मानवशास्त्रावरसुद्धा जबरदस्त पगडा बसू लागलेला होता. यानंतर मानवशास्त्राने वंशसंकल्पनेचे रूढीजड अर्थ नाकारले व मानवतावादाचा ढासळता पाया पुन्हा भक्कम केला. पावडरमेकरच्या लिखाणात मानवशास्त्रातील या मानवतावादी दृष्टीकोनालाच प्राधान्य आहे.

तिचा हा दृष्टीकोन क्षेत्रकामातील तिच्या बहुविध अनुभवांतून विकसित पावलेला आहे. याची खूण पटते ती अमेरिकेतील मिसिसिपीच्या काळ्या-गोऱ्यांच्या वांशिक बलाबलातून घटित जीवनाचे तिने केलेले चित्रण पाहताना, तसेच आफ्रिकेतील कॉपरबेल्टमधील गोऱ्यांनी लादलेल्या जाचक नियमपद्धतींना जखडून दिवस कंटणारे काळे मजूर आणि त्यावर सत्ता गाजवताना स्वतःच्या वांशिक श्रेष्ठतेची पूर्ण खात्री पटलेला एक गोरा अधिकारी वर्ग, आणि आफ्रिकन लोकांविषयी आणि त्यांच्या लोकसंस्कृतीविषयी सहृदयता बाळगणारा पण वसाहतवादी विचारसरणीत हितसंबंध गुंतल्याने ती उल्लंघू न शकणारा व आपली चाकरी आणि आपल्या आतला आवाज यांच्या कात्रीत सापडलेला दुसरा अधिकारी वर्ग सारख्याच सहानुभूतीने आपल्या समोर जिवंत उभा करताना एकाच समाजातील दोन मतप्रणालीनुसार वागणाऱ्या व्यक्तींच्या पोटात शिरण्याचे तिचे कसब जाणवते.

एखादा मानवशास्त्रज्ञ एका सर्वस्वी अपरिचित अशा समाजात शिरतो तेव्हा तो अनिवार्यपणे तिथल्या सर्वांनाच परका असतो. पण या परकेपणाला हळूहळू मित्रत्वाचे आणि सहृदयतेचे अस्तर लाभते. ह्या सहअनुभूतीशिवाय नुसतीच माहिती गोळा करण्याचा हव्यास असलेल्या मानवशास्त्रज्ञांच्या अपयशाची उदाहरणे तिने दिली आहेत तर केवळ सहानुभूतीच्या आहारी जाऊन वैचारिक तटस्थता गमावून बसण्याचा धोकाही तिने दाखवून दिलेला आहे.

***मानवशास्त्रज्ञाची जीवनपद्धती***

प्रत्येक मानवशास्त्रज्ञाला क्षेत्रकामात अनेक



4395.1

निर्णायक क्षण असे येतात की यावेळी आपण तटस्थरीत्या निरीक्षण करायचे की अन्यायमूलक सामाजिक संघर्षात उडी घ्यायची हे ठरवावे लागते. अज्ञान व अंधश्रद्धेमुळे मृत्यूमुखी पडणारे जीव उघड्या डोळ्यांनी पाहात राह्यचे की मधे पडून आपल्याला माहीत असलेली उपाययोजना करून पाह्यचा धोका पत्करायचा अन् अपयश आले तर इतके दिवस साधत आलेली जवळीक आणि विश्वास क्षणात गमावून टाकण्याचा धोका पत्करायचा ?

एक दुरस्थ आणि मित्र या दोन्ही भूमिकांत शिरून प्रत्येक मानवशास्त्रज्ञाला जगावे लागते. पावडरमेकर म्हणते की हा मित्र आणि दुरस्थ यातला तोल साधणे आवश्यक आहे. ही तारेवरची कसरत जमली तर क्षेत्रकाम सुलभ होते हे तिचे मुख्य सूत्र आहे. किंवहुना या दोहोंत संतुलन शोधण्यातच मानवशास्त्रज्ञाची **जीवनपद्धती** सामावलेली आहे असे तिला वाटते.

## *"तुझे काम होते टिपणे घेण्याचे"*

हा सम्यक आणि संतुलित दृष्टीकोन अंगी बाणवण्यासाठी तिने खूप परिश्रम घेतलेत. अथकपणे टिपणे घेताना ती आपल्याला दिसते. वेळ अपुरा पडला तरी टिपणे संपत नाहीत. काळ्यागोऱ्यांतील अन्यायमूलक संबंधात अनेकदा भावनेला हात घालणारे प्रसंग येत. अशावेळी तटस्थपणे त्या परिस्थितीचा आणि घटनांचा दस्तावेज समाजापुढे मांडून समाजमन जागे करण्यासाठी ती आपल्या परीने झटली. याबाबतचे एक उदाहरण तिने दिले आहे. "गप्पाटप्पात माझा एक मित्र मला सांगू लागला की 'एकदा दारूगुत्यात काळ्यागोऱ्यांची बाचाबाची सुरू झाली. मीही मध्ये पडलो. खूप मार खाल्ला'..." तेव्हा तिच्या मनात येते की "पण तू त्यावेळेस गदारोळात शिरलाच कसा? तुझे काम होते टिपणे घेण्याचे."

## *सामाजिक दस्तावेज*

पावडरमेकरच्या लिखाणातून तिने सर्व संभ्रमातून स्वतःकरता आखून घेतलेली वाट स्पष्टपणे दिसते. लोकांच्या जीवनांचे व त्यातील संघर्षाचे सहक्षेपण करण्याची जबाबदारी तिने आपली मानली आणि ती निभावताना प्रक्षोभित प्रसंग आले तरी त्यांना ती अभ्यासाच्या माध्यमातून सामोरी गेली. वैयक्तिक कृतीतून आपण ही किंवा ती बाजू घेतली असती तर त्या काळात ती कृती फार एकांगी झाली असती असे तिला वाटते. कॉपरबेल्टमधील काळ्यागोऱ्या दोन्ही समाजात ती सारखेच मिसळली व त्यांच्यातील आर्थिक, राजकीय व सामाजिक संबंधातील दडपणुकीचा मागोवा घेऊन त्यातील आफ्रिकन समाजावरचा अन्याय आणि राज्यकर्त्यांच्या सांस्कृतिक श्रेष्ठत्वाच्या लढायांखाली लपलेला त्यांचा नैतिक ऱ्हास त्यांच्याच निर्दशनास आणण्याचा तिने प्रयत्न केला.

## *चौकटी हलवताना*

तिच्या अभ्यासविषयांचा आढावा घ्यावा तो हे दिसते की केवळ संतुलित समाजांचाच अभ्यास तिने केला नाही. आघातप्रत्याघातांनी आंदोलित होणारे सामाजिक वास्तव तिने पुन्हा पुन्हा धुंडाळले. काळ्या किंवा गोऱ्या समाजांचा स्वतंत्रपणे अभ्यास न करता त्यांच्या परस्पर-संबंधानीच तिला का आकृष्ट केले, या अभ्यासाला कारणीभूत असलेले तिच्या व्यक्तिमत्वाचे विशेष व अभ्यासपद्धती कोणती होती याचा तिने आढावा घेतला आहे. ज्या विषयाच्या आणि अभ्यास पद्धतीच्या चौकटीत ती काम करत होती ती चौकटच चाचपून, हलवून, निरखून पाहण्याचा हा एक प्रयत्न आहे.

लंडन स्कूल मधील सोनेरी दिवसात ती मॅलिनोवस्कीची विद्यार्थिनी होती. पाहुणा अध्यापक म्हणून आलेल्या रॅडक्लिफ ब्राउनने पण तिला काही काळ शिकवले. या दोघांच्या विचारांची दिशा एक

असली तरी त्यांच्या शैलीत फरक होता. या दोन शिक्षकांचा आणि नाणावलेल्या मानवशास्त्रज्ञांचा तिच्यावर खोल परिणाम झाला. ते प्रपादित असलेल्या 'फंक्शनॅलिस्ट' प्रणालीने सामाजिक वदल व संघर्षाचा विचार प्रामुख्याने कधीच केला नाही ही त्यांची मर्यादा होती. पावडरमेकरच्या लिखाणाचे मोल आहे ते तिच्या निवेदनाच्या प्रामाणिकतेत. आपण कुठली विचारसरणी स्वीकारतो हा नेहमीच वादग्रस्त मुद्दा असतो याची तिला जाणीव आहे. आपल्या निर्णयांना आत्मसमर्थनाचा मुलामा चढवण्याचा आग्रह तिच्यात दिसत नाही. प्रत्यक्ष सामाजिक कृती न करण्याचा तिचा जो निर्णय आहे त्याच्या मर्यादा ती स्वतःच सांगते. त्या वरोवरच तिच्या थोर शिक्षकांपुढे एक पाऊल टाकून संतुलित समाजांच्या अभ्यासापुरते आपले विश्व मर्यादित न करता ती जेव्हा प्रक्षोभक सामाजिक परिस्थितीतले सूक्ष्म धागेदोरे शोधत जाते व प्रश्न करण्याचे धाडस दाखवते तेव्हा मानवशास्त्रावरील तिचा विश्वास जाणवतो.

***"मला हेच सांगायचे होते..."***

आपल्या अभ्यासविषयाकडे पाहता पाहता आपण स्वतःही एक अभ्यासविषय आहोत आणि ज्या अभ्यासपद्धतीतून आपण इतर समाज, संस्कृती व रीतिरिवाजांचा अभ्यास करतो ती अभ्यासपद्धतीच अभ्यासविषय होऊ शकते आणि मानवशास्त्राला एक नवे परिमाण देऊ शकते या जाणिवेतून लेखिकेने येथे स्वतःचा अनुभव विशद केला आहे.

तिचे हे पुस्तक वाचून तिच्या अनेक शिक्षकांनी, सहकाऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी तिला म्हटले "मला हेच सांगायचे होते पण कामाच्या धामधुमीत ते लिहायचे नेहमीच राहून गेले...."

---

*'स्ट्रेंजर अँड फ्रेंड : द वे ऑफ अॅन अँथ्रॉपॉलॉजिस्ट'*
**हॉर्टेन्स पावडरमेकर, १९६७.**

## वर्गणीदारांस सूचना

ज्यांची वर्गणीची मुदत संपली आहे, त्यांनी पुढील वर्षासाठीची वार्षिक वर्गणी रु. ३०/- फक्त त्वरित पाठवावी, ही विनंती.

*- संपादक*

## लेखकांसाठी

'हाकारा' हे आदिवासी प्रश्नांना वाहिलेले एकमेव मराठी नियतकालिक आहे. यातून आदिवासी जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला, तसेच आदिवासी कार्यकर्ते व आदिवासीमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, काही सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासींसंबंधीच्या कथा, कविता इत्यादी सर्व प्रकारच्या लेखनांस प्रसिद्धी दिली जाईल. आपण आपले साहित्य नियमित पाठवीत जावे.

*- संपादक*

# महाराष्ट्रातील धनगर : एक दर्शन

डॉ. प्रभाकर बी. द्राक्षे

***प्रस्तावना***

"पशुपालन" हा शब्द जीवनाचा उदरनिर्वाह यासाठी लागू होतो. मानवाने प्राणी कसे पाळावयाचे व धान्यनिर्मिती कशी करावयाची या गोष्टी ते एकाचवेळी शिकले. अगदी आदिवासी समाज हा त्याच प्राथमिक अवस्थेतील उदाहरण होय. जेवण, कंदमुळे, प्राण्यांचे दूध, मांसावरोबर घेत होता. त्यानंतर याच लोकांची-विशिष्ट अशा की जे गवत व धान्य उदा. शेळ्या, मेंढ्या, घोडे, गाढव, उंट, गायी व काही मानव समूह शेती करणाऱ्या व प्राणी कळप करून राहणाऱ्यांमध्ये गणना होऊ लागली. ज्या लोकांचे राहणीमान केवळ कळप व प्राणी यांच्यावरच अवलंवून आहे अशांना "पशूपालक" (आलीचीन-१९०३) म्हणतात. ज्या ठिकाणी शेती करून धान्य पिकविणे कठीण होते, अशाच भागात या समाजाची प्रगती झालेली दिसून येते.

पण असे असून देखील काही शंका राहतात. त्यापैकीच एक म्हणजे त्यांची स्वतंत्र अशी स्वावलंवी अर्थव्यवस्था आहे का? या समाजाने बैठे व्यवसाय करणाऱ्या व पिकविलेले धान्य आणि काही साधने मिळतात अशा लोकांशी आपले व्यापारी संवंध ठेवले का? अशा या अदलाबदल पद्धतीमध्ये जिवंत प्राणी व वाहतूक सेवा या वावतीत धनगर समाजाचे योगदान दिसते. (क्लिंपटन-१९६८)

इतर अनेक आर्थिक गरजांच्या विकासाप्रमाणे या समाजाचा विकास झाला नाही. जगाच्या मध्यभागी पूर्वेकडील भागात व आफ्रिकेमध्ये यांचा विस्तार दिसून येतो. भारतात अश्मयुगाच्या उत्तरार्धात म्हणजेच इ. स. पूर्वी १५०० च्या दरम्यान या समाजाविषयीची पहिली नोंद मिळते. ज्याठिकाणी ६०० मि.मि. पेक्षाही कमी पर्जन्यमान होते अशा अल्प नापीक भागापुरतीच या जमिनीची मर्यादा दिसून येते. पारंपरिक पद्धतीने प्राणी पाळणे व थोड्या प्रमाणात शेती करण्यात ते दिवस घालवितात. अशा या समाजाचा दोन अंगाने अभ्यास करता येईल. तो म्हणजे, एक "आर्थिक घटक" आणि दुसरा "सामाजिक सांस्कृतिक समाज." महाराष्ट्रातील अनेक धनगर किंवा मेंढपाळ करणाऱ्या समाजालाच "धनगरी" जमात म्हणून ओळखले जाते.

***महाराष्ट्रातील धनगर***

महाराष्ट्रातील निरनिराळ्या भागातील मेंढपाळ करणारे "धनगर" हेच भटके मेंढपाळ म्हणून ओळखले जातात. १९०१ च्या मद्रासच्या शिरगणतीच्या अहवालानुसार "धनगर" किंवा "दोनिगर" यांना "मराठा-धनगर" आणि "गुरेढोरे पाळणारे धनगर" म्हणून संवोधले गेले. त्यांची सध्याची लोकसंख्याही अजून अज्ञात आहे. १९०१ च्या शिरगणीनुसार ती २,३२,९०१ पुरुष आणि २,३४,७२१ स्त्रिया असे मिळून ४,७६,६२२ इतकी होती. त्यानंतरच्या शिरगणतीची आकडेवारी उपलब्ध नाही. तरी सुद्धा डॉ. गाडगीळ व डॉ. मल्होत्रा यांनी धनगर लोकसंख्येविषयी माहिती गोळा केली आहे. (डॉ. मल्होत्रा आणि डॉ. गाडगीळ, १९८१) त्यांच्या मते १९८१ मध्ये महाराष्ट्रातील धनगरांची लोकसंख्या ही जवळ जवळ दोन दशलक्ष म्हणजे एकूण राज्याच्या ७% इतकी होती.

निरनिराळया अभ्यासकांनी महाराष्ट्रातील धनगरांचे अनेक उपजातीत वर्णन केले आहे. प्रत्येक उप-जात ही आपली "स्वावलंबी सामाजिक घटक" म्हणून ठराविक प्रदेशातच विभागली आहे. काही धनगर हे आपले राहण्याचे ठिकाण बदलतात म्हणून त्यांना भटकी जमात (ब्राक्षे, १९८२) या नावाने ओळखले जाते. निरनिराळया अभ्यासकांनी धनगरांच्या खालील निरनिराळया उप-जाती सांगितल्या आहेत.

धनगर समाजातील समाजसेवकांपैकी एक - श्री. लांडे यांनी धनगरांच्या जवळ जवळ ३५ उप-जाती सांगितल्या आहेत. मुक्तेश्वर यांच्या मते त्या २१ आहेत. डॉ. शर्शीच्या (१९७८) मते त्या केवळ ४ आहेत. डॉ. मल्होत्रा आणि डॉ. गाडगीळ यांनी आपल्या अभ्यासातून २३ उप-जातींची नोंद केली आहे. ही त्यांची विभागणी परिसर आणि व्यावसायिकता या आधारावरती दिसून येते.

उपजातींची आकडेवारी, निरनिराळया अभ्यासकांच्या मते वर्तविली आहे त्याचे कारण त्यांनी विभागणी करताना वापरलेल्या तत्त्वामुळे होय. सध्याच्या अभ्यासासाठी डॉ. मल्होत्रा आणि डॉ. गाडगीळ यांची माहिती अगदी अलिकडील व व्यापक पर्यवेक्षणावरती अवलंबून असल्याने उपयुक्त व स्वीकारणीय आहे. वरील २३ उप-जातींची अंदाजे लोकसंख्या आणि त्यांचा प्रदेश यांच्याविषयी माहिती तक्ता क्र. १ मध्ये दिली आहे.

तक्ता क्र. १

**महाराष्ट्रातील धनगरांची विभागणी**

| अ. क्र. | उप-जातींचे नाव | मातृभाषा | पारंपरिक व्यवसाय | अंदाजे लोकसंख्या | प्रदेश |
|---|---|---|---|---|---|
| १. | अहिरे | मराठी | मेंढपाळ व लोकर विणकाम | ३,००,००० | अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बुलढाणा, धुळे, जळगाव, नाशिक. |
| २. | डांगे/म्हसके/गवळी | मराठी | म्हशी व शेळी पाळणे | १,००,००० | मुंबई, कोल्हापूर, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सिंधुदुर्ग, सातारा. |
| ३. | गढारी-धनगर | हिंदी | मेंढ्या पाळणे | २०,००० | अकोला, अमरावती, औरंगाबाद, धुळे, जळगाव. |
| ४. | गढारी-निखार | हिंदी | मेंढपाळ आणि लोकर विणकाम | ५,००० | अकोला, अमरावती, औरंगाबाद, धुळे, जळगाव. |
| ५. | हालमत | कानडी | मेंढपाळ आणि लोकर विणकाम | ८,००० | कोल्हापूर, सांगली. |
| ६. | हंडे | कानडी | मेंढपाळ | ४,००० | सांगली, कोल्हापूर. |
| ७. | हाटकर | मराठी | मेंढपाळ | ५,७३,००० | अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलढाणा, धुळे, जळगाव, कोल्हापूर, नांदेड, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, वर्धा, यवतमाळ. |

| अ. क्र. | उप-जातींचे नाव | मातृभाषा | पारंपरिक व्यवसाय | अंदाजे लोकसंख्या | प्रदेश |
|---|---|---|---|---|---|
| ८. | हत्ती-कंकन | मराठी | मेंढपाळ | ५,००० | बीड, नांदेड, उस्मानाबाद, सोलापूर. |
| ९. | कान्नड | मराठी | मेंढपाळ | १५,००० | अहमदनगर, औरंगाबाद, बीड, मुंबई, रायगड, नाशिक, पुणे, सातारा, सोलापूर, ठाणे. |
| १०. | खाटिक | मराठी | मटन-विक्री | १५,००० | अहमदनगर, औरंगाबाद, बीड, मुंबई, नाशिक, पुणे, रायगड, सातारा, सोलापूर, ठाणे. |
| ११. | कुटेकर | मराठी | मेंढपाळ आणि लोकर विणकाम | १,५०,००० | अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलढाणा, जळगाव, नागपूर, नांदेड, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, पुणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, सातारा, सोलापूर, वर्धा, यवतमाळ. |
| १२. | कुरमर हत्ती-कंकन | कानडी | मेंढपाळ | १५,००० | भंडारा, चंद्रपूर. |
| १३. | कुरमर उन्नी-कंकन | कानडी | मेंढपाळ | ५,००० | भंडारा, चंद्रपूर. |
| १४. | लांडेत | मराठी | मेंढपाळ | ६,००० | अमरावती, भंडारा. |
| १५. | मेंढे | मराठी | मेंढपाळ | ३०,००० | कोल्हापूर, पुणे, सांगली, सातारा, सोलापूर. |
| १६. | सणगर | मराठी | लोकर विणकाम | १०,००० | अहमदनगर, बीड, कोल्हापूर, पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, सोलापूर. |
| १७. | शेगार | मराठी | मेंढपाळ, लोकर विणकाम आणि शेती | ४०,००० | अहमदनगर, औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, लातूर, पुणे, सोलापूर. |
| १८. | तेलंगी | तेलगू | मेंढपाळ आणि लोकर विणकाम | ५,००० | नांदेड, परभणी. |
| १९. | थिलारी / खिलारी | मराठी | मेंढपाळ व गुरेढोरे पालन | ७,००० | धुळे, जळगाव, नाशिक. |
| २०. | उन्नी-कंकन | मराठी | मेंढपाळ व गुरेढोरे पालन | ६,००० | उस्मानाबाद, सोलापूर. |
| २१. | वऱ्हाडे | मराठी | मेंढपाळ आणि सूत विणकाम | १,५०,००० | अकोला, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ. |
| २२. | झाडे | मराठी | मेंढपाळ आणि लोकर विणकाम | १५,००० | चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ. |
| २३. | झेडे | मराठी | मेंढपाळ आणि शेती | ८०,००० | कोल्हापूर, सोलापूर |
| | | | **एकूण** | **१९,६४,०००** | |

*श्रेणी व्यवस्था*

महाराष्ट्रातील धनगर हा अनेक संघांचा समूह आहे. या उप-जातींमध्ये अगदी काही मोजक्या गोष्टीत साम्य दिसून येते. एवढेच नव्हे तर दुसऱ्या उप-जातीतील सदस्यांना आपल्या इतक्या दर्जाने वागविले जात नाही. एकंदर असलेल्या स्तर व्यवस्थेतील धनगर ही अगदी तळाची किंवा कमी उप-जात आहे असे समजले जाते. हे केवळ त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे व त्यांच्या मागासलेपणाच्या राहणीमानामुळे होय. समाजापासून दूर डोंगराच्या उतारावर किंवा टेकड्यावरील जागा निवडून त्या ठिकाणी वास्तव्य करणारी एक उप-भटकी जमात म्हणून धनगराकडे पाहिले जाते. फक्त काही प्रासंगिक वेळीच जवळच्या खेडुतांशी त्यांचा संबंध येतो. ज्या परिसरात ते आपले जीवन स्थिरावतात त्या परिसराचा त्यांच्या रोजच्या जीवनावर बराच प्रभाव पडतो. त्यांचे नित्याचे जेवण म्हणजे बाजरी, मका, ज्वारीची भाकरी व काहीवेळा उकडलेला भात हे होय. ते नेहमी दूध व दुधापासूनचे पदार्थ खात असत पण सध्या तेच पदार्थ पैसे मिळविण्यासाठी विकले जातात. त्यांच्या या जेवणातील ८.ट्काबरून परिस्थितीच्या प्रभावाची जाणीव होते.

*आर्थिक घडामोडी व कर्तृत्व*

आपण राहतो त्या ठिकाणच्या जंगलातील निरनिराळ्या घटकांच्या विक्रीतून रानटी पद्धतीच्या शेती करण्यातून शेळ्या, गुरेढोरे, म्हशी वगैरे पाळून आपला नित्याचा आर्थिक व्यवहार कित्येक शतके हा "धनगर" समाज चालवितो. पण सध्याच्या वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात उपलब्ध असणारी शेती व उत्पन्नावर पडलेला ताण आणि जलदगतीने होत असलेली जंगलतोड यामुळे त्यांचे जीवन चिंताग्रस्त बनत चालले आहे. आणि हे जर असेच चालत गेले तर एक दिवस त्यांना नाइलाजाने पारंपरिक व्यवसाय सोडून देऊन आपल्या राहत्या जागेचा त्याग करून ज्या ठिकाणी कौशल्याची गरज नाही अशा मानवी शक्ती लागणाऱ्या कारखान्यामध्ये नोकरी मिळविण्यासाठी शहरी भागाकडे धाव घ्यावी लागेल. सध्या ही परिस्थिती बऱ्याच अंशी उद्‌भवली आहे. आणि त्यामुळेच धनगर शहराकडे स्थलांतरीत होत आहेत. उदा. कोल्हापूर शहरात खेड्यातून स्थलांतरीत झालेले ५ ते ७ हजार धनगर वेगवेगळ्या उद्योग समूहांमध्ये विभागले आहेत.

*भौतिक संस्कृती*

वाढत्या संपर्क साधनांमुळे व रस्ते वाढीमुळे सध्या धनगरांच्या भांडवली संस्कृतीत व राहणीमानात हळूहळू बदल होत चालला आहे. दूध विक्रीतून भरपूर पैसा ते मिळवू लागले आहेत. त्यांच्या घरामध्ये सुद्धा प्रगती होत आहे. विशेषत: गवताच्या छपराऐवजी कौलारू घरे होत चालली आहेत. शिवाय हा बदल त्यांच्या कपड्यावरून, बदललेल्या घरातील भांडी व इतर साधनांवरून दिसून येतो. पारंपरिक "बंडी" किंवा "काचौळ्या" ची जागा आता "रंगीत शर्ट" ने घेतली आहे. "जुन्या पागोट्या" ऐवजी आता नवीन पिढी पांढऱ्या टोप्या वापरू लागली आहे. शाळेला जाणाऱ्या मुलांसाठी त्यांचा वेगळा शाळेचा पोशाख झाला आहे. तरी सुद्धा जंगलात राहणाऱ्या स्त्रियांच्या कपड्यात मात्र कोणताच फरक पडलेला दिसून येत नाही. रोजचे जेवण तेच राहिले आहे. दूध पिण्याऐवजी विकले जात आहे व पारंपरिक "ताक" पिण्याच्या सवयीची जागा ताजा "चहा" घेत आहे. पुरुषांमध्ये विडी ओढणे व तंबाखू खाणे या सवयी वाढत आहेत. दारू पिण्याची सवय तर मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

### *सामाजिक संघटन*

मूलभूत सामाजिक संघटनांचा घटक म्हणजे "कुटुंब". ही विभक्त व संयुक्त अशा दोन्ही प्रकारची दिसून येतात. जे शेती करतात व ज्यांच्यामध्ये शेती हेच उत्पन्नाचे मुख्य साधन आहे त्यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात संयुक्त कुटुंबपद्धती असलेली दिसून येते. पण याच्या उलट, जे गुरे-म्हशीवर उपजीविका करतात, इंधन म्हणून लाकडे विकतात, शिवाय जंगलातील अनेक घटक विक्री करणारे व लहान सहान व्यवसाय करणाऱ्या धनगरांच्यामध्ये विभक्त कुटुंब पद्धती असलेली दिसून येते. याचा अर्थ असा नव्हे की, मुद्दाम कुटुंबाची संख्या लहान ठेवली जात आहे. कुटुंबनियोजन विषयक शासकीय कार्यक्रम त्यांच्यापर्यंत पोहचले आहेत. पण मुलांचा जन्म म्हणजे "घरच्या उत्पन्न वाढीत मदत" असा समज असल्याने कुटुंबनियोजन एवढ्या मोठ्या प्रमाणात त्यांच्यात रुजू शकले नाही.

विपुल पीकधारण करण्यासाठी लग्न हे अटळ व अतिशय गरजेचे आहे असा समज धनगरांमध्ये आहे आणि अविवाहित प्रौढ हे समाजाच्यादृष्टीने कुचकामी आहेत असे ते समजतात. धनगरांची लग्नाविषयीची महत्त्वाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे -

अ) स्त्रियांचे महत्त्व सूचित करणारी वधू किंमत, ब) नाजूक परिस्थितीचे व आर्थिक विवंचनेचे दर्शन घडविणारे साधेच लग्न सोहळे व कार्यक्रम, क) देव सर्व शक्तिमान आहे म्हणून त्यावर श्रद्धा, ड) दूरच्या धनगर समाजाबरोबर संपर्क ठेवण्यातील अडचणींमुळे आपल्या जवळ असलेल्या समाजाशी रक्ताचे (वैवाहिक संबंधातून) संबंध वाढविणे हा समज, इ लग्न म्हणजे पवित्र बंधन समजून घटस्फोटासारख्या प्रकाराकडे दुर्लक्ष.

### *धनगरांचा धर्म*

त्यांच्या आर्थिक परिस्थितीनुरूप थोड्या फार फरकाने योग्य असा "हिंदुत्ववाद" हाच त्यांचा साधा धर्म असल्याचे दिसून येते. त्यांच्यामधील प्रार्थना म्हणजे "गाऱ्हाणे" व "भविष्यकथन" या धर्मातील वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या दोन गोष्टी होत. खेडूत व शहरी लोकांच्या संपर्कात आल्याने गणपती, हनुमान, विष्णू, शिव इ. देवांचा समावेश त्यांच्या मंदिरात केला गेला, जे त्यांना यापूर्वी अज्ञात होते. त्यांच्यातील बदलणाऱ्या संस्कृतीमुळे त्यांच्या वरती "संस्कृतीकरणाचा" प्रभाव पडत असलेला दिसून येतो.

### *स्थलांतर*

अर्थव्यवस्थेतील पद्धतीच्या बदलामुळे दररोजच्या जीवन-चरितार्थाची समस्या सोडविण्यासाठी लागणाऱ्या साधनांची समस्या गंभीर होत गेली त्यामुळे शहराच्या ठिकाणी, जिथे नोकरी मिळेल तिथे सतत स्थलांतरीत होण्याची प्रवृत्ती धनगरांमध्ये वाढत गेली. कोल्हापूरमध्ये हा समाज सर्व प्रकारची कामे करतो व स्त्रिया घरकाम आणि नोकरी करीत असलेल्या दिसून येतात. कोल्हापूर शहराकडे धनगरांचे आर्थिक बाबीमुळे होणारे स्थलांतर विचारात घेण्यासारखे आहे. जरी त्यांनी नवनवीन व्यवसाय आत्मसात केले व नोकऱ्या मिळविल्या असल्या तरी त्यांचा पारंपरिक गुरे-म्हशी पाळण्याचा व्यवसाय बऱ्याच धनगरांनी पुढे चालविला आहे. शहरातील मर्यादित जागेमध्ये सुद्धा हा व्यवसाय केला जातो. यावरून त्यांची पारंपरिक व्यवसायाविषयीची असलेली ओढ व आवड दिसून येते. केवळ पारंपरिक म्हणून ते हा व्यवसाय करीत नाहीत, तर जीवनचरितार्थ चालविण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणून ते त्याकडे पाहतात.

### *बदलते स्वरूप*

शहरी वातावरणाच्या प्रभावामुळे त्यांचे राहणीमान, वस्तीचे ठिकाण व मूलभूत सुखावह जीवन इ. मध्ये जलद गतीने बदल होत असलेला दिसून येतो. शहरी भागातील साक्षरता प्रमाण जास्त आहे. नवीन पिढी जी शहरात जन्मली व वाढली त्यांची तुलनात्मक शैक्षणिक संदर्भातील पातळी वाढली. कुटुंबाच्या आकारात सुद्धा बदल झालेला दिसून येतो. सर्वसाधारण निरीक्षणावरून असे दिसून येते की, कुटुंबनियोजनामध्ये पुरुष नसबंदी कमी प्रमाणात होत आहे. किमान एक मुलगा असावा हा विचार कुटुंबाचा आकार कमी करण्यास एक मोठा अडसर ठरत आहे. अशा पद्धतीने स्थलांतर हे धनगरांचे जीवन विकसित करण्यास उपयुक्त ठरले आहे. असे असून सुद्धा स्थलांतरामुळे - जागेचा प्रश्न, ठराविक उत्पन्न, परिस्थितीवर विसंबून उत्पन्न इ. प्रश्न निर्माण झाले आहेत.

### *समारोप*

खालील निरीक्षणावरून सर्वसमावेशक सूचना होतील या जाणीवेने येथे हा अभ्यास समाप्त करून एकंदरीत निरीक्षणावरून धनगरांविषयी खालील सूचना करता येतील.

धनगर हा पारंपरिक शेळया, मेंढ्या, म्हशी, गुरे, घोडे पाळण्याचा व ज्या गोष्टी त्यांना आवडतात त्या करणारा समाज आहे. या संदर्भात संबंधित सत्ताधारी लोकांनी त्यांना चांगली जनावरे खरेदी करण्यासाठी सहजशक्य कर्जाची सोय करावी. धनगरांना योग्य ती मदत पुरविली आणि त्यांना स्फूर्ती दिली तर हेच पारंपरिक किंवा "नैसर्गिक कळपधारी माणसे" म्हणून ओळखले जाणारे धनगर, महाराष्ट्र राज्यात "श्वेत क्रांतीत" योग्य असे योगदान देऊ शकतील.

औद्योगिकरणाच्या परिणामांमुळे जंगलतोड समस्या ही एक गंभीर समस्या म्हणून ओळखली जात आहे. इंधनाचा तुटवडा जाणवत आहे. यामुळे काही औषधी वनस्पती व जंगलापासून होणारी इतर निर्मिती यांचा तुटवडा जाणवत आहे. याशिवाय यामुळे सरासरी पर्जन्यवृष्टीचे प्रमाण बरेचसे घटत चालले आहे आणि म्हणून जंगलतोड ही केवळ धनगर वा जंगलात वास्तव्य करणाऱ्यांपुरती मर्यादित नाही तर सर्व समाजावरच परिणाम घडविणारी समस्या होऊन बसली आहे. आणि म्हणूनच "सामाजिक वनीकरणा" सारख्या कार्यक्रमांना शासन प्रोत्साहन देत आहे. या संदर्भात सुद्धा धनगरांना व्यवस्थित हाताळले वा सहकार्य केले तर जंगले वाढविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा ठरेल. ते त्यांना स्वतःस व सर्व समाजास उपयुक्त ठरेल.

धनगरांना बऱ्याचशा औषधी वनस्पतींच्या जातींविषयी जाणीव आहे. आणि म्हणून या विषयातील तज्ञ अशा धनगरांच्या प्रात्यक्षिक ज्ञानाचा वापर निरनिराळ्या वनस्पती वाढविण्यासाठी करता येणे शक्य आहे. आणि या सर्वांचा उपयोग धनगरांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व भारतातील पारंपरिक औषधे वापरण्याच्या बाबतीत पुढील संशोधन करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकेल.

हिंदू धर्मामध्ये धनगरांचा सर्वसाधारण दर्जा खालच्या स्वरूपाचा असल्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची आर्थिक परिस्थिती होय. आर्थिक प्रगती करण्याची त्यांच्यामध्ये इच्छा निर्माण होण्यासाठी त्यांना योग्य ती मदत व स्फूर्ती देण्याची गरज आहे. आणि जर हे शक्य झाले तर निश्चितपणे ते सुद्धा आपला सामाजिक दर्जा उंचावण्यास समर्थ ठरू शकतील.

# कातळी निखारे

डॉ. अनिल सहस्रबुद्धे

*१९४२ ऑगस्ट क्रांती सुवर्णमहोत्सवानिमित्त स्वातंत्र्य समराच्या पहिल्या पर्वात आदिवासींनी बजावलेल्या क्रांतीकार्याचा रोमांचकारी परिचय घडविणारी एकांकिका.*

(स्त्रीपात्रविरहित ऐतिहासिक एकांकिका)

**पात्र - (प्रवेशानुसार)**

**१) कॅप्टन माकिनटोश** : कंपनी सरकारचा सेनाधिकारी. कॅप्टन, कोळी ठाकर यांचे सरकार विरुद्धचे बंड मोडून काढण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे.

**२) पेटर** : कॅ. माकिनटोशकडील शिपाई.

**३) स्विफ्ट** : कंपनीसरकारचा गुप्तहेर व लढवय्या, सेनाधिकाऱ्यांचा सल्लागार.

**४) सक्रू** : गोविंद खाडेच्या टोळीतील लढवय्या व धडाडीचा अनुयायी.

**५) गेनबा** : गोविंद खाडेच्या टोळीतील अनुयायी, गुप्तहेर म्हणून काम करतो. कॅ. माकिनटोशच्या सैन्यात दाखल होऊन गोटापर्यंत प्रवेश मिळवितो.

**६) रामजी भांगरे** : कोळ्यांच्या उठावाचा पुढारी. त्याने सुरुवातीला पोलिस अधिकारी म्हणून नोकरी स्वीकारली होती. नंतर तो गोविंद खाडेला मिळाला.

**७) गोविंदराव खाडे** : स्वातंत्र्य संग्रामाचा मुख्य पुढारी. रतनगडचा महालकरी होता. तो जहागिरदार होता. इंग्रज सरकारची सत्ता अमान्य करून स्वातंत्र्याची घोषणा करतो. कोळी ठाकरांचा उठाव घडवितो.

**८) काही शिपाई** : कॅ. माकिनटोशच्या सैन्यातील काही शिपाई.

* * *

***सुरुवातीला पडद्यामागून निवेदन***

हा इतिहास आहे १८२७ ते १८३५ चा. वनवासींचा - कोळी आणि ठाकरांचा. स्वराज्याची ताकद गिरीकंदरात, रानात राहणाऱ्या वनवासींमध्ये आणि गड कोट किल्ल्यातच होती. हिंदवी स्वराज्याचं स्वप्न वनवासींच्या प्रयत्नांनीच साकारलं होतं. स्वराज्याचा अस्त होत असताना पुनः उषःकालचे स्वप्न त्याच वनबंधूंनी हिंदुस्थानला दाखविलं. हा पहिल्या स्वातंत्र्य समराचा इतिहास. हे समर लढणाऱ्या, त्यात धारातीर्थी पडणाऱ्या त्या स्वातंत्र्य-योध्यांना कोटी कोटी प्रणाम. त्यांच्या बलिदानातच 'हे श्रींचे राज्य' असल्याची ग्वाही आहे.

## इतिहास असा :

पुणे ब्रिटिशांच्या ताब्यात गेले. होळकरांचाही पाडाव झाला. सह्याद्रीच्या सर्वोच्च गिरीशिखरांच्या प्रदेशातील म्हणजे कळसुबाई परिसरातील या डोंगाण भागातील होळकरांच्या अधिपत्याखालील किल्ले कॅप्टन सिक्सने उद्ध्वस्त केले. त्यावेळी गोविंदराव खाडे रतनगडचा महालकरी, प्रमुख सेनाधिकारी होता. त्याला छोटीशी जहागिरही मिळाली होती. त्याला सर्व अधिकार पेशव्यांकडून मिळाले होते. गोविंदराव खाडेने इंग्रजांनी देऊ केलेल्या नोकरीवर लाथ मारली आणि तो पुन्हा उद्योगाला लागला. आणखी बारा तेरा किल्लेदारांची अशीच गत झाली होती. ते सगळे लोक रामजी भांगरेला येऊन मिळाले. रामजी भांगरेने मात्र आपल्या या साथीदारांसह इंग्रजांनी दिलेली पोलिस खात्यातील नोकरी स्वीकारली. परंतु हे सारे वनराज! त्यांना इंग्रजांच्या या पिंजऱ्यातलं जीवन रुचेना. रामजी भांगरे तर वर्षभरातून एकदा 'भेट' नावाचा दरबार भरवून मोठ्या इतमामाने प्रेमाचे नजराणे स्वीकारू लागला. इंग्रजांनी हा प्रकार बंद करताच आपल्या साथीदारांसह त्यांनी सर्वांनी मिळून नोकरीचे राजीनामे भिरकावले आणि रामजीने उघड बंड पुकारले. गोविंदराव खाडेची काळजीच दूर झाली. अनायासे त्याचे बळ वाढले.

रामजी भांगरे आणि त्याचे साथीदार गोविंदराव खाडेला येऊन मिळाले. पाचएकशेची फौज जमा झाली. दौलत मिळवून मोठी फौज उभारण्यासाठी इंग्रजांकडून, कंपनी सरकारकडून अभय मिळवून सावकारी करणाऱ्या सावकारांवर आणि सरकारी खजिन्यांवर दरोडे सुरू झाले. दुसऱ्या बाजूला गोरगरीबाना अभयदान, कर्जमुक्ती, प्रपंचाला मदत मिळू लागली. गोविंद खाडे आणि रामजी भांगरे आणि त्यांचे साथीदार रयतेला देवदूत वाटू लागले. इंग्रजी सत्तेला आव्हान दिले गेले. गिरीकंदरातला वनवासी एकत्र आला. आणि स्वदेश, स्वराज्य, स्वातंत्र्यासाठी लढा सुरू झाला. कोळी ठाकरांचा उठाव!!

कॅप्टन माकिनटोशने हे बंड मोडून काढण्याचा विडा उचलला. सुमारे सात वर्षे त्याला सतत प्रयत्न करूनही यश आले नाही. परंतु अखेर फंदफितुरी आणि मोठा फौजफाटा यांच्या बळावर कॅप्टन माकिनटोशने भिवंडी, मालेगाव, अहमदनगर व पुणे येथून सैन्यपथके पुढे पुढे सरकवीत आणून बंडखोरांना रानात त्यांच्या ठाण्यावर कोंडीत पकडले. गोविंदराव खाडे, रामजी भांगरे आणि त्यांचे काही साथीदार अनुयायी सापडले. परंतु रामा किरवा दक्षिणेत अहमदनगर जिल्ह्यात भिल्लांच्या टोळीस मिळाला. कॅप्टन माकिनटोशला गोविंद खाडे आणि रामजी भांगरे यांना पकडूनही अपयशी झाल्यासारखेच वाटत होते. तो या वनवासींच्या म्होरक्यांना घेऊन अहमदनगरच्या किल्ल्याकडे निघाला. अहमदनगरच्या किल्ल्यात या दोन्ही वनराजांना कायमचे कोंडण्याचा निर्णय झाला आणि अहमदनगरच्या वाटेवर हे नाट्य घडले...

[ पुणे मार्गावरील वोटा या गावी कॅप्टन माकिनटोशची छावणी. कॅप्टन माकिनटोशचा शामियाना फारसा सजविलेला नाही. चार मोठ्या संदुकांचा उपयोग करून त्याची बैठक, कार्यालय, बेड, डायनिंग असे सगळे मांडल्यासारखे. एका बाजूला दाराजवळ एक धगधगती मशाल. मधल्या एका संदुकेवर कंदील पेटलेला. भोवताली मदिरेची तत्कालीन कुपी - वाटली, ग्लास, पाणी, ॲश ट्रे इ. वस्तू पडलेल्या आहेत. मशालजी मधूनच मशालीत तेल घालतो आहे. त्याची सूक्ष्म नजर माकिनटोशवर आहे. लालबुंद चेहऱ्याचा, साडे सहा फूट उंचीचा तडफदार, साधारण चाळीशीचा कॅप्टन माकिनटोश एकटाच चिरूटाचे जोरदार कश घेत फेऱ्या मारतो आहे. तो अतिशय अस्वस्थ आहे. मधूनच कसल्याशा विचारात मग्न होतो आहे. कश घेता घेता तो पेटत्या मशालीकडे आपल्या घाऱ्या डोळ्यांनी एकटक पाहतो आहे.

मशालींच्या प्रकाशात त्याचा लालबुंद चेहरा भयानक वाटतो आहे. कोणाची तरी चाहूल तो मधूनच घेतो आहे. बाहेरून गडबड, धावाधाव, घोड्यांचे खिंकाळणे, बैलांचे हंबरणे आदींचे आवाज येत आहेत. त्याच्या अस्वस्थपणे अशा फेऱ्या सुरू असतानाच बाहेरून शेकोटी भोवती विजयोन्मादक गाण्याचे आवाज, ढोलक्याचा ताल, मधूनच आरोळ्या वाढत जात आहेत. या आवाजाने कॅप्टन अधिक अस्वस्थ होतो आणि तो बाजूला असलेल्या झांजेसारख्या घंटेवर टोल लगावतो. तसा सैनिकी वेषातला पेटर उपस्थित होतो. कॅप्टन माकिनटोश रागाने लाल झाला आहे.]

**कॅ. माकिनटोश :** (ओरडून) पेटर, स्टॉप धिस नॉनसेन्स!

**पेटर :** व्हॉट सर!

**कॅ. माकिनटोश :** ओ ऽ यू नॉनसेन्स!

**पेटर :** येस सर!

**कॅ. माकिनटोश :** यू फूल! स्टाप दॅट डान्सिंग ॲण्ड शाउटिंग.

**पेटर :** येस सर! (सॅल्यूट ठोकून निघून जातो. कॅप्टन माकिनटोशच्या फेऱ्या पुन्हा सुरू होतात. बाहेरचा कोलाहल थोड्या वेळाने थांबतो. तेवढ्यात घोड्यांच्या टापांचा आवाज थेट शामियान्यापर्यंत येतो. घोडा थांबतो. कॅप्टन माकिनटोश आतुरतेने पुढे होतो. स्विफ्ट, एक उमदा योद्धा आणि हेर, प्रवेशतो. त्याने केलेल्या सॅल्युटकडे माकिनटोशचे लक्ष नाही. तो अधीर झाला आहे.)

**कॅ. माकिनटोश :** येस, स्विफ्ट, फाउंड देम?

**स्विफ्ट :** (मान खाली जाते) नो सर! सॉरी!

**कॅ. माकिनटोश :** व्हाय? व्हाय? टुला माहित आहे आमाला, ॲट एनी कॉस्ट, कोणत्याही किंमतला टे हवे आहेत.

**स्विफ्ट :** येस सर, बट ...

**कॅ. माकिनटोश :** नो नो, इट ओन्ट डू!

**स्विफ्ट :** सर, रामा किरवा ॲण्ड लक्षा टाकूर कोटे पळाले समजत नाई. वुई आर हेल्पलेस! सर, दे रॅन लाईक रॅट्स सर! बट ...

**कॅ. माकिनटोश :** स्विफ्ट यू? यू टेलिंग मी धिस?

**स्विफ्ट :** बट सर, वुई वुईल फाइंड देम आऊट वन डे ऑर द अदर.

**कॅ. माकिनटोश :** (हातातलं जळतं चिरूट ॲश ट्रेमध्ये टाकतो. ग्लास घशात ओततो आणि पुन्हा खाली आपटतो, हात विशिष्ट पद्धतीने झटकतो. त्याचा चेहरा एकदम पालटतो. काही सुचले असावे.) ऑल राइट, स्विफ्ट, जस्ट वेट. वुई वुईल ट्राय अदर वे! एक मार्ग बंद झाला की दुसरा मार्ग नेहमीच उघडलेला असतो. आपण गोविंदराव खाडे आणि रामजी भांगरे यांच्याकडून माहिती काढू!

स्विफ्ट : हौ सर?

कॅ. माकिनटोश : फॉलो मी! दॅटस् ऑल!

स्विफ्ट : वट सर ...

कॅ. माकिनटोश : (घण्टेवर टोला लगावतो. पेटर येतो) पेटर, गोविंद खारी आणि रामजी शांत झाला काय?

पेटर : वघून येतो सर.

कॅ. माकिनटोश : (मूड मध्ये) स्विफ्ट, एनी वे दे फॉट लाईक टायगर्स! टेला पकडला नसटा टर टे डाय झाला असता लडटा लडटा! ओन्ली, सिंप्ली वॉरीयर!

स्विफ्ट : सर टे टेंच्या नेशनसाटी लढतात!

कॅ. माकिनटोश : नो नो! नॉट ओन्ली दॅट. टे, रास्कल ह्या शिवाजीच्या नावाने लडटाट!

स्विफ्ट : वट सर टे हा किंगडम कोली टाकरचा आहे सांगतात.

कॅ. माकिनटोश : धिस इज व्हेरी कन्फ्युझिंग. टेंचा कास्ट खरा का टेंचा रिलीजन खरा? ऑल ओव्हर इंडिया टे त्यांचा रिलीजनचा रिलेशन सांगटाट ॲण्ड गावाट व्हिलेजमधे टे कास्ट सांगटाट. बॅटल फिल्डवर हरा हरा म्हादेव! चा शाऊट करटाट दॅट टाईम टेंचा कास्ट कोटे जाटो कळत नाई.

स्विफ्ट : सर हौ क्यान वुई कन्सिडर देम.

कॅ. माकिनटोश : ओऽ! दोज इन्डियन्स आर पुअर ॲण्ड गिव्ह मनी ऑर सर्व्हिस ॲण्ड बाय देम. दे वुईल वी फेथफुल टू यू! टे नोकरी इमानदारीने करटाट. टेना मनी आणि नोकरी दिली टर धन्याशी व्हेरी फेथफुल राहटाट. दॅट टाईम, टे कास्ट रिलीजन नेशन कशलापन विचार नाई करीत. दे डोन्ट थिंक अबाउट इट! वुई वुईल युज इट!

स्विफ्ट : वट, आय थिंक हे ह्येंच्या वावतीत जमेल? आय ॲम डाउटफुल!

(तेवढ्यात वाहेर प्रचंड कोलाहल होतो. वंदुकांचे आवाज. दोघेही अतिशय अस्वस्थ होतात. कॅ. माकिन आपल्या कमरेच्या पट्ट्याचे पिस्तुल चाचपून पाहतो. वाजूची रायफल उचलतो आणि स्विफ्ट आणि तो एकदमच बाहेर धावतात. मशालजी त्यांचे बोलणे शांतपणे ऐकत होता. तो ते वाहेर पडल्याची खात्री करून घेतो. उगाच मशालीत तेल घालतो. कोणाची तरी तो चाहूल घेत आहे. त्याला त्या वाहेरच्या कोलाहलाचे काहीच वाटत नाही. तेवढ्यात सक्रू ठाकर धापा टाकीतच त्याच्याकडे येतो. त्याच्या हातात वंदूक आहे. गुडघ्यापर्यंत धोतर, छातीपाटीवर काळं घोंगडं करकचून वांधलेलं. डोक्याला मुंडासं. झुपकेदार मिशा. डोळे इंगळासारखे लाल.)

सक्रू : गेनवा आरं समदा फापालला रं गड्या! रामा किरवानं आख-वंद एक पंचवीसा गड्यांली इठ लावला दोन्ही वाघांली सोडवाया. पर इठ त आक्रित झाला! रामजीना आरडून

आमाली माघारी फिराया सांगातला आन ह्या गोऱ्या माकडाली आपुच कडका लागला तुम्हा सांगावा म्हून आलु. आता म्या निंगतु पर तू जपून रय रं गड्या. तुहा संशव त नाही ना त्येंली?

**गेनबा :** सक्रूवा, पद्य रं गड्या ज्या झाला त्या झाला, पर रामा किरवाला आन भिल्ल रामोशाच्या उमाजी नायकाला सांगावा सांग क मना सायवाचा डोळा फंद करणाऱ्याव हाये. सायव गोविंदरावाली आन रामजीला त्येंच्याक चाकरी दिऊन वश करण्याचा इचार करताय. आता काय हुनार त्या यक त्या म्हादेवालाच म्हाइत रं बावा (त्यांचा हा संवाद चाललेला असतानाच कॅ. माकिनटोश गेन्याच्या मागच्या बाजूनं येतो. त्याला गेन्याची मसलत कळते आहे. क्षणाचाही विलंब न करता आपल्या पिस्तुलानं तो गेन्याला मारतो. पण हे घडत असताना सक्रू सावधपणे सूवाल्या करतो आणि जाताना 'हर हर महादेव' ची जोरदार आरोळी ठोकतो. रंगभूमीवर क्षणभर अंधार त्यातून गेनबाचे शव हलविण्याचे आवाज येतात. मशाल विझविण्यासाठी अगोदरच झाकण तयार ठेवावे. पुन्हा उजेड. आता नवा मशालजी दिसतो आहे. समोर कॅ. माकिनटोश पेटीवर काहीसा खुशीत बसला आहे. त्याच्या समोर दंडाबेडीत जखडलेला व मागे साखळीने लोढणे बांधलेला रामजी भांगरे दिसतो आहे. डोक्याला पगडी नाही. केसाच्या जटा वाढलेल्या. बाराबंदी, धोतर दुपाखी, झुपकेदार मिशा, कपाळाला शेंदुराचा टिळा. कानात भीकबाळ्या. धारदार नजर. बलदंड देह. किंचित बुटका. त्याच्या बाजूला स्विफ्ट उभा आहे. दोघांच्या हालचालींकडे रामजीचे बेगुमान लक्ष आहे. कॅ. माकिनटोश शांतपणे दोन पेल्यात मद्य ओततो आहे. पुन्हा चिरूट पेटवतो आहे. रामजीच्या मागल्या बाजूस दाराजवळ दोन हत्यारबंद शिपाई आहेत. त्यातला एक पेटर आहे.)

**कॅ. माकिनटोश :** रामजी भंगारे आमी टूमच्या फाईट पाहून खूश झाला. बट आमाला हा शमजत नाइ टुमी आमच्याबरोबर कशासाटी लडते?

**रामजी :** सायबा अरं, लढनार जीवात जीव असं पवोत लढनार! ह्ये राज आमचं, ही माती, दऱ्या, डोंगर, रान ही कळसाई समदं आमचं! आमच्या आईला तुमी खायला निगाला? मनं आमी का लढतो? अरं अजुक बी सुटलो तर तुला साता समिंद्रापल्याड हाकलून लावल्या विगर ऱ्हाणार नाई! मनं का लढतो?

**कॅ. माकिनटोश :** सॉरी सॉरी, अरे टुमी असा रागावू नको. आमचा सांगना कळला नाई टुमाला. स्विफ्ट ...

**स्विफ्ट :** हावालदारसाहेब, टुमी खरा आमचा माणूस. आमच्या अधिकाऱ्यांनी टुमची नोकरी काढून घेतली आणि लोकांकडून मिलनारी भेट स्टॉप केली हाच टुमचा राग. आमचा अधिकारी चुकला. आपण चूक चा बरोबर करू.

**रामजी :** त्या जमायचा नही आता. मरान आलं तरी बी त्येची पर्वा नही या रानच्या वाघांना. शबुद पाळणारी जात आमची. शिवाची आण खाऊन शबुद दिला आमी या मातीला.

पयल्या पहारी चुकलो त्येचाच दुक हाये जिवाला.

**कॅ. माकिनटोश :** अरे अरे, आमची चाकरी करा असा आमी सांगते नाई. ओन्ली रिक्वेस्ट हाये आमची टुमी आमच्याशी काम्प्रमाइज करा आय मीन संधी करा आमी या मुल्काचा कारभार टुमाला डेटो. टुमी आमाला फकस्त महसूल डेट जा. आमी टुमाला टनखा डेऊ, काय? अंडरस्टॅंड? समजला?

**स्विफ्ट :** हे पहा रामजी टुमचं ह्या माटीवर, मुलुखावर प्रेम आहे? तेच्या साटी टुमी लढता? पन टुमच्या मुलुकाला काय मिलाला पेशव्यांकडून आन होळकरकडून?

*** रामजी :** ते आमचं धनी! ह्या देशाचं वारस! शिवाजीराजांचं वारस! अरं राज्याची उभारनी करताना येळ गावला असता तर सोन्याची गावं उभारली असती तेनी! लुटून वेचिराख केली नसती!

**कॅ. माकिनटोश :** येस, येस! टुमी खरा बोल्टा! आमी पेशवाला सांगत होटा टुमी आमचा ऐका पन टेनी . . .

**रामजी :** वारं सायबा, तुमचा ऐकायचा मंजी तुमाली आमचा राज हडप करू दियाचा असाच ना? त्या पक्षी मरान काय वाइट?

**स्विफ्ट :** अरे रामजी टुमी सायेबाचं म्हननं समजावून घेट नाइ! टुमच्या हिंदुस्थान मंदी हिंदूंची आन यवनांची लहान लहान राज्य. टुमी आपापसात लढता मुल्कावरून. मुलुक वाढत नाही आन त्येचात रयतेला सुखपन नाही!

**कॅ. माकिनटोश :** करेक्ट! फकस्त आपसात भांडण. टेचा मधून देशाचा, मुलकाचा, रयतेचा फायदा काय नाही. टुमच्याकडे फौज राखून लढायला पैसा नाही. टुमी कंपनी सरकारची फौज घेता आन आपसात लढता टेचा फायदा काय? आमी टुमचा राज्य घेण्यासाठी नाय लढत. आमाला राज्य नको! टुमचा लढण्याने आमचा व्यापारचा नुकसान होटे. आमी येशुचा शांततेचा संदेश ये देशात पोचण्याचा खटपट करते. आमी हिंदुस्थानचा एक नेशन टयार करण्याचा खटपट करटो. आमाला राज्य नको आमी व्यापार करटो टुमी टुमचा राज्य करा! या साटी आमी टुमची मदत मांगटो!

**रावजी :** वारं सायबी कावा! मंजी पैका तुमच्या हातात द्या आन आमी मेंढरं वळा, असाच क नायी? आमचा जीव ग्येला तरी ह्या जमायचा नायी!

**कॅ. माकिनटोश :** रामजी हे टुमी बोलता? टुमचा आन कंपनी सरकारचा जुना संबंध टुमी आमचे. टो गोविंद खाडे दरोडे घालून लूट करणार, कोल्या ठाकरचा उठाव करून आमच्या आगेन्स्ट बंड करनार, टो बी आमच्या बरूवर संधीला राजी जाला!

**रामजी :** (क्षणभर गोंधळून) काय गोविंदजी? अरं, माकडानु त्या ह्या जलमात हुनार नाही!

**स्विफ्ट :** रामजी हे खरं आहे. त्यानीच सांगितला टुमी रामजीला सांभाळा मी टुमच्या बरोबर आहे. त्येचासाटी आमी टोमाला बोलवला. टुमी आमचे. टुमाला आमी गोविंद खाडे पेक्षा मोटा तनखा देऊ!

**रामजी :** सायबानु, एकडाव सांगण्याचा प्रयत्न केला पुन्हादी ह्या सांगण्याचा मन वी करू नका. टुमी का आमाली उलीउली पोरा समाजला काय? अरं माझा जावाई, गोविंदाचा पोरगा किस्ना तुमच्याशी टक्कर देत धरित्रीवर पडला. त्येचा रगत दिकुल अजुक सुकला नही. त्या रगताशी बेइमान हुया सांगता? काय आमची खांडुळी करायची कर. तुझं कैदीच हाये. ह्या रगताचा तरी धरित्रीवर सांडल जीव सार्तकी लागन! ह्या पाप नार्यी हुयाचा!

**कॅ. माकिनटोश :** (रामजी बोलत असतानाच त्याचा पारा चढू लागला आहे.) मंजे, रामजी टुमी आमचा संधी नाकारटा! कंपनी सरकारला हे सहन होणार नाही. टुमची काटडी सोलून काढू! मरेपर्यंत कस्टडीत ठेवू! मरू देनार नाई आन जगु देनार नाई! यू फूल, रास्कल!

**रामजी :** आरडतो कशापायी सायबा? तुला काय करायचा कर जा ना. पर ह्ये धेनात घे ह्या रानचं जनावर तुज्या उष्ट्या अन्नासाटी लालचावनार नाही.

**कॅ. माकिनटोश :** ओ यू! स्विफ्ट, टेक हिम अवे! फटके मारा ह्येला! चामडी सोला ह्या रास्कलची! सळइने डाग द्या टेला. ह्येच्या किंकाळ्या आमी येटे बसून ऐकतो! (स्विफ्ट शिपायांना खुणावतो. शिपाई रामजीला घेऊन निघतात. जाता जाता रामजी ओरडू लागतो.)

**रामजी :** अरं भ्याडा, हत्तीच्या पायी दी नहित कड्यावरून टाकून दी भ्येत नही आमी मरनाला! तुझ्या वांझुट्या डरकाळण्याला भेनार काय? अरं मरू पर इमान इकनार नाय? हर हर महादेव! (त्याच्या या आरोळीने कॅ. माकिनटोश पूर्ण अस्वस्थ होतो.)

**स्विफ्ट :** सर, मला वाटतं आपण ह्याना विचारण्यात आपली ताकद आता घालवू नये. इटस् ऑफ नो यूज!

**कॅ. माकिनटोश :** नो, नो, स्विफ्ट, आजून आपण ट्राय करू. गोविंद खाडे त्येच्या सनच्या मरनानं हेल्पलेस झाला आहे. टो जरूर आपणाशी संधी करील. व्हॉट डु यु थिंक?

**स्विफ्ट :** डजंट मॅटर, सर! परंतु आय थिंक ह्येचा काय उपयोग होनार नाही दे आर अडॅमन्ट!

**कॅ. माकिनटोश :** ऑल राइट वुई वुईल ट्राय. ब्रिंग हिंम हिअर (स्विफ्ट जातो. कॅप्टन माकिनटोश शांतपणे चिरूटाचे कश घेतोय. मधूनच शून्य नजरेने मशालीकडे पाहात काही विचार करतो आहे. योग्य असे पार्श्वसंगीत सुरू आहे. स्विफ्ट येतो.)

**स्विफ्ट :** (सॅल्युट) सर, ही इज कमिंग.

**कॅ. माकिनटोश :** (नकळत उभा राहतो. त्याचा चेहरा बदलला आहे. आपला चेहरा प्रसन्न व हसरा राहावा अशी तो काळजी घेत आहे. दंडाबेडी घातलेला गोविंद खाडे प्रवेशतो. मागे साखळीला बांधलेले लोढणे त्याच्याबरोबर सरकत येते. उंचनिंच, धिप्पाड, भरदार छातीचा. केस वाढलेले, पिळदार मिशा. बाराबंदी, धोतर दुटांगी गुडघ्यापर्यंत.

पायात जोडे. करडी, जरवी नजर. काळाकभिन्न देह. दंडाबेडी सहज पेलीत आला आहे.) या या, वेलकम, जहागिरदार साहेब, टुमचे स्वागत!

**गोविंदराव खाडे :** वा! सायबा तुमची स्वागत करण्याची रीत न्यारीच हाये! अदुगर दंडाबेडीत बंदी करायचा, लोढणं अडकवायचा आन वर या या, जागीरदार सायब म्हनत स्वागत करायचा! (जरबेनं) का बोलिवलं आमाली इठं?

**कॅ. माकिनटोश :** गोविंद खारी आमी टुमाला टुमचा गुन्हा माफ करायचा ठरवला आहे! तुम्हाला आमी सोडून देनार!

**गोविंद खाडे :** गुन्हा, कंचा गुन्हा केला आमी?

**कॅ. माकिनटोश :** (चपापून, नरमाईने) स्विफ्ट टेल हिम.

**गोविंद खाडे :** अरं, तूच सांगना आमचा गुन्हा कंचा त्यो.

**स्विफ्ट :** जहागिरदारसाहेव, कंपनी सरकारनं पेशवाई खालसा केली. गड कोट किल्ले ताब्यात घेतले. राज्य कंपनी सरकारचं झालं आन तरी टुमी बंड करून उठता. हा तुमचा गुन्हा कॅ. साहेबांनी माफ करायचा ठरविला आहे.

**गोविंद खाडे :** (चवताळून) अरं साहेबा, हा मुलुक आई हाये आमची. ती आमचीच व्हाणार ह्ये सांगायचा कंचा गुन्हा हाये! गुन्हा तुमी केला आमच्या स्वराज्याचा. साता समिंद्रा पल्याडून आला आन वर आमचाच मुलुक हडप करन्याचं कारस्थान करून वर आमाली गुन्हेगार ठरविता! यापाराच्या नावानं यिऊन राज्य हिसकता आन वर गुन्हेगार आमी काय? वारं वा! चोराच्या उलट्या बोंबा!

**कॅ. माकिनटोश :** (गोविंदरावला काहीसा शांत करण्याचा प्रयत्न करीत) जागिरदारसाहेब त्ये जाऊ द्या. आमचं सांगणं इतकंच आमी टुमाला बंदीतून सोडतो. टुमी आमच्याशी संधी केला पायजे. आमी टुमाला टुमचा जागीरचा गावे परत देते. वर टनखा देते कायम!

**गोविंदराव :** (मिश्किलपणे) अरे, वा! संधी करा मनं. आमचंच घियाचा आन आमच्या पुढं टुकडा टाकायचा. कुत्र्याची जात नाय ही सायबा. हां संधी हुईल. बरूबर संधी हुईल पर येकाच अटीवं!

**कॅ. माकिनटोश :** (अधीरतेने) सांगा सांगा, अट सांगा.

**गोविंदराव :** अट येकच. आमचं राज्य सोडून निघून जायचं लगुलग! आमी व्यापार चालू ठिवू आपल्याशी! हाये मान्य?

**कॅ. माकिनटोश :** (सावधपणे) गोविंदजी टुमचा राज्य हायेच कोटे? हा तर कंपणी सरकारचा राज्य हाये हिंदुस्थानवर! टुमी तो आमच्या सरकारलाच चॅलेंज करटा! टुमी बंड केला! आमचा राज्यचा पैसा खजीना लुटता!

**गोविंदराव :** सायबा हे बंड नाही. ही लडाई हाये आमच्या सवराज्यासाठी! हिंदवी सवराज्यासाठी!

खजिना आमचा ! राज्य आमचं ! माती आमची आन इमान बी आमचंच. (कॅप्टन माकिनटोश त्याच्या ह्या उत्तराने भडकतो.)

**कॅ. माकिनटोश :** राज्य कंपनी सरकारचा आहे. टुमी बंदी आमचा ! स्लेव्ह ! टुमचा लाईफ, जगणं मरणं आमच्या हाती आहे. अजून विचार कर, आमाला मदट केली तर टुमी जगणार !

**गोविंदराव :** (कॅ. माकिनटोशचा अंदाज घेत) मदत मांगाना सायवा ! बळजवरी आन हक सांगू नको ! आमच्या दारी आलेल्या कोनाला बी मदत करतो आमी !

**स्विफ्ट :** वा जाहागिरदार साहेब, आमाला हीच अपेक्षा होती आपल्याकडून. कंपनी सरकार जागोजागी होणाऱ्या बंडाचा नायनाट करू पाहत आहे. एक संपला की दुसरीकडे दुसरा सुरू होतो. ते थांबवून आमाला हिंदुस्थानच्या रयतला सुखी करायचा आहे !

**गोविंदराव :** (छद्मीपणे) असा रयतेची खरी काळजी हाये कंपनी सरकारला.

**कॅ. माकिनटोश :** (गोविंदरावचा रोख न कळून) हां आमी ये हिंदुस्थान एक नेशन करू. रयतला सुखी करू. येच्या साटी रयतची काळजी करनार टुमच्या सारक्यांनी मदट केली पायजे कंपनी सरकारला.

**गोविंदराव :** (आणखी खोचून) बोल सायबा बोल, कंची मदट हवी कुंपणी सरकारला आमच्याकडून आन बदल्यात काय देनार आमाली.

**कॅ. माकिनटोश :** गोविंदखारी, टुमी आमाला टो रामा किरवा कोटे दडून बशला टे शांग. टेचा टो भिल्ल लोकची टोली कोटे आहे टे शांग. आमी टोमाला सोडटो टुमची जागीर पन डेटो. तनखा डेटो !

**गोविंदराव :** अरं सायबा इक्ताच ना ! म्या सांगतु समदा पर रामजी भांगराचा काय ? तेला बी सोडला पायजे.

**स्विफ्ट :** जरूर सोडू. टुमी अदुगर टे रामा किरवाचा आन भिल्ल टोलीचा सांग.

**गोविंदराव :** सायवा बंदी झाडाला टांगून त्येला जागीर द्याचा तुझा न्याय न्यारा म्हनायचा. अरं अदुगर ही बेडी काढ आमच्या अंगावरली ! अरं रानच्या वाघाला फास्यात धरला तरी बी असा जेरबंद नायी करीत आमी.

**कॅ. माकिनटोश :** येस येस जरूर टुमाला शोडटो, पन अदुगर माहिती सांग.

**गोविंदराव :** त्या नही जमायचा. अदुगर माजी आन रामजी भांगऱ्याची दंडाबेडी काढून आमाली समुरासमुर आन.

**कॅ. माकिनटोश :** रामाजी भंगारेला आमी थोडा टाईम मागेच शोडला. टो आटा आमचा फौजदार जाला. टेना आमचेशी संधी केला. टेचा आटा कायच सवाल नाय. टुमी आमचा ऐका टुमी सांगितलेल शगळा करटो.

**गोविंद खाडे :** (संतापला आहे.) सायबा, रामजी आता तुहा हावालदार नायी तुह्या टाकल्या कुटक्याला

शेप हलवाया! सायवा अरं आमी आन खालीयां म्हादेवाची, सवराज्यासाठी परान गेला तरी माघार घेनार नाही! तुझा सायवी कावा कवाच ध्येनात आलांरं मह्या! रामजी हर हर म्हादेवाची हाळी दिली तवाच!

**कॅ. माकिनटोश :** (आता चांगलाच खवळला आहे.) यू शट अप. सांग फक्त येस ऑर नो? टुझ्याकडून कशा काढून घ्यायचा टे आमाला चांगला माहिती आहे.

**स्विफ्ट :** सर, डोन्ट वी अँग्री! मोठ्या प्रयत्नांनी हे लोक हाती लागलेत. त्यांना मृत्यूचं शासन करा म्हणजे आपोआपच शरण येतील सगळे भिल्ल, रामोशी, कोळी, ठाकर, वारली, कोकाणा सगळे.

**कॅ. माकिनटोश :** नो नो याना मारायचं, पण एकदम नाही कस्टडीत कोंडून अश्याच अवस्थेत. टेंचा ब्लडचा एक एक ड्राप जळून जाईल तो पर्यंत. तरच दहशत बसेल यांना!

**गोविंद खाडे :** (संतापला आहे.) अरं सायवा, हजार वर्ष आमाली जळाया लागलं तरी ह्ये रानचं वाघ हार नही खानार! अरं ह्या म्हादेवाचा राज हाय! कोनाली हिसकून नही घ्येता याचा! हे राज व्हावा ही शीरीची विच्छां हाये आन आमी ते पुन्यांदा उभा केल्या विगर ऱ्हानार नाई!

**कॅ. माकिनटोश :** (संतापाने लाल झाला आहे. ग्लासातली मदिरा गोविंदरावच्या तोंडावर फेकतो. किंचाळतो) यू बास्टर्ड! यू फुल टू आमाला सांगतो! टुमाला जेरबंद केला टो पन टुमचाच लोकांकडून! टुमचा लोक आमचा बूटचा पॉलिश करून जगते. टे आटा स्वराज्य आन स्वातंत्र्य कसा मिळवणार. टेना राज्य करन्याचा डोकाच नाई! टुमाला स्लेव्हरीत गुलाम म्हणून जगावा लागेन. कंपनी सरकार हिंदुस्थान मधल्या सेव्हेज माणसांना रानटी माणसांना कल्चर्ड करण्यासाठी प्रयत्न करटे. टो टुमी टेच्यात बंड करून दरोडा घालून आमाला टरास डेटे! टुमाला जाळट जाळट मारला पायजे. स्विफ्ट घेऊन जा टेला. आन दोघांना नाइट डीनर बी देऊ नका. त्या ऐवजी हंटरचा आवाज ऐकवा! गो!

**गोविंदराव :** (स्विफ्ट शिपायांना खुणावतो. ते गोविंदरावला ओढून नेऊ लागतात. जबरेने थांवत ओरडून सांगतो.) थांव सायवा! ऐक! हिंदवी सवराज्यासाठी जलमभर रगताचा थेंब असं पारोत फटकं खायाची तयारी हाये आमची, समद्या रानवाघरांची, वनराजांची. मरणाला भेणारी जात नव्हं ही, मरणाशी खेळणारी जात हाये आमची. एक दी तुला आन तुझ्या पलटणीला ढुंगाला पाय लावून पळावा लागन तुझ्या देशात. त्या विगर गप न्हायी हुनार हे वनराज. तुझ्या हंटरच्या फटक्या फटक्यातून आन रगताच्या थेंबाथेंबातून हजार म्हादेव पुन्यांदा जनमतील. आई भवानी कळसाईचा आशीर्वाद हाये ह्यो! तुला नाय कळायचा. तू निस्ता पगत रय. 'हर हर म्हादेव!'

(जोराने ठोकलेल्या आरोळीचे प्रतिध्वनी घुमत असतात. शिपाई त्याला घेऊन जात असतात. कॅ. माकिनटोश आता पिसाळला आहे. तो फेऱ्या मारतोय अस्वस्थपणे. गोविंदजी गेल्या वाटेकडे मधूनच तिरस्काराने पाहतो आहे. स्विफ्ट येतो.)

**स्विफ्ट :** सर, या लोकांच्या आरोळ्या कोणाला तरी सूचना देत आहेत. या दोघांना सोडवून नेण्यासाठीच थोड्या वेळा पूर्वी पाच पंचवीस जणांनी हल्ला केला छावणीवर. कोठून आले कळत नाही. आपला मशालजी सामील होता त्यांना. डोन्ट टेक एनी रिस्क, सर!

**कॅ. माकिनटोश :** ओऽ स्विफ्ट वुई विन द बॅटल वट वुई लॉस्ट इट (हताशपणे) आपण जिंकलो तरी आपण हरलो! टुमारो अर्ली मॉर्निंग, उद्या पहाटे अहमदनगरकडे चला. ह्या दोघांना बंदीत टाकू. येना कस्टडीत टाकूनच आपनाला दुसऱ्या टोळ्यांकडे जाटा येईल. (दीर्घ श्वास घेऊन) स्विफ्ट जंगलात राहणारे हे जंगली लोक स्वराज्यसाटी, हिंदुस्थान साटी एव्हडे इमान कशा. यांचा इमान विकला पायजे. (विचार करू लागतो. काहीसा शांत होतो आहे. शांतपणे चिरूट पेटवतो आणि विचारमग्न, बोलू लागतो.) स्विफ्ट, १९२७ पासून आपन येंचा पाठलाग करटो आटा १९३५ आला टो हे सापडला. टरी आमचा मोहिम पूर्न नार्यी झाली, राज्याचा राजधानी कॅप्चर करना इझी आहे वट दीज ट्राइब्ज! हा रानटी लोक डेन्जरस!

**स्विफ्ट :** सर, आपण शांत असा. आपण पहाटे अहमदनगरकडे कूच करू आणि तेथून पुढे लगेच मी त्या रामा किरवाची आणि भिल्ल टोळ्यांची माहिती काढायला सुरूवात करतो. (अजून कॅ. माकिनटोश विचारमग्नच आहे.)

**कॅ. माकिनटोश :** (एकदम) नो नो, स्विफ्ट या ट्राइब्जना केवळ असा पकडून डांबून चालणार नाई टेंचा पुना पुना उठाव होईल. टेंना हिंदुस्थानच्या मेन फ्लो पाशून, मुख्य प्रवाहापाशून फोडला पायजे, टेंचा पॉव्हरटीचा उपयोग करून! वुई मस्ट स्प्लिट देम, वुई मस्ट डीफर देम! आपण टयांचे मनावर हॅमर केला पायजे, दे आर ओन्ली ट्राइब्ज, दे आर नॉट हिंदूज! टे फक्त एक जमात हाये, टे हिंदू नाई! (हे वाक्य एको सारखं रिपीट होत असतानाच रंगमंचावर अंधार होतो. अंधारात छावणीचे दृश्य नाहीसे होते. मागे प्लेन पडदा आहे. संदूका उचलल्या गेल्या आहेत. पहाटेच्या हालचालींचे आवाज येत आहेत. बैलगाड्या जोडल्या जात आहेत. घोडी खिंकाळत आहेत. बिगुल वाजतो आहे. अखेर छावणी हालली आहे. गाड्या पुढे गेल्याचे आवाज येतात. काही क्षण नंतर पडद्यामागूनचे निवेदन - पहाटे कॅप्टन माकिनटोशचे सैन्य कैद्यांना घेऊन निघाले. आळे मार्गे नगरकडे जात असतानाच माळशेजच्या बाजूने काही हल्ल्याचा भास झाला. कॅप्टन माकिनटोश सावध झाला. बिगुल वाजले. होय, कोणीतरी स्वारीला आडवे आले होते - आणि हर हर महादेव! च्या आरोळ्यांनी आसमंत दुमदुमून गेला. आणि बंदुकांच्या फैरी झडू लागल्या. घोड्यांचे खिंकाळणे, बैलाचे हंबरणे पुन्हा पुन्हा ऐकू आले. अवघा हलकल्लोळ. पण काही क्षणच आणि पुन्हा शांत - रंगमंच उजेडात - लोडेड गन हातात असलेला कॅप्टन माकिनटोश - पूर्ण लष्करी वेषात. बरोबर पेटर आहे. प्रवेशतात.)

**कॅ. माकिनटोश :** पेटर हु इज दॅट! ए लेडी वॉरीयर! बट ऑपिअर्ड लाइक अ डेमन! अचानक आपल्या पलटणीवर हल्ला केला! ओन्ली अ फ्यू! पंचवीस शिपाई! गोविंद खारी आन रामजीला

नेण्यासाठी! ह्या रायफलने टेंना शंपवला! वट हौ वंडरफुल! ये लोक रात्री झोपटे नाई? आपन अर्ली मॉर्निंग जाणार हा टेंना कशा समजला? ओ इट्स सिंपली लाइक अ शेक्सपिरीयन ड्रामा! (तेव्हढ्यात स्विफ्ट प्रवेशतो.)

**स्विफ्ट :** सर, दे ऑल रॅन अवे!

**कॅ. माकिनटोश :** एक शुद्धा हाटी नाइ लागला? नो वडी?

**स्विफ्ट :** टू सर, टू! दोन हाती लागले वट सर बोथ आर डेड!

**कॅ. माकिनटोश :** कौन?

**स्विफ्ट :** सक्रू टाकूर, सर! दॅट लेडी मरता मरता त्याला पळून जायला सांगत होती.

**कॅ. माकिनटोश :** हू वाज शी? कौन टी?

**स्विफ्ट :** सर, दॅट लेडी रूक्मीणी, गोविंद खारीच्या सनची वाईफ रूक्मीणी ॲण्ड रामजी भांगराची डॉटर किस्नाची वाईफ सर, टुमी त्या दोघांना अचूक शूट केला सर वट ...

**कॅ. माकिनटोश :** (व्याकूळ अधिरतेने) वट व्हाट, स्विफ्ट?

**स्विफ्ट :** आवर टू डायमंड, आपले दोन हिरे रोनॉल्ड ॲण्ड पीट

**कॅ. माकिनटोश :** व्हाट?

**स्विफ्ट :** येस सर दे आर डेड! टे संपले.

**कॅ. माकिनटोश :** ओऽ नो नो! (मग एकदम शांत होत) आगेन वुई आर डिफीटेड! स्विफ्ट आपण पुन्हा हारलो. (हताशपणे रायफलने रोनाल्ड आणि पीटला अभिवादन करीत असतानाच पडदा पडतो. दूरवर हर हर महादेव! च्या आरोळ्या.)

# गोंदण

**डॉ. हेमंत आपटे**

'गोंदणे' ह्या विशिष्ठ कलेला खूप जुनी परंपरा आहे. इजिप्तमधील जुन्या चित्रांमध्ये गोंदण्याचे उल्लेख सापडतात. साधारणतः ३००० वर्षांपूर्वीपासूनचे पुरावे गोंदण्याचे बाबतीत सापडू शकतात. अजूनही कित्येक पारंपरिक संस्कृतींमध्ये गोंदण्याची कला प्रचलित आहे. ह्यातील काही आकृत्यांना खास करून सुशोभनासाठी वापर इतकेच महत्त्व आहे. आपल्या विशिष्ठ जमातीचे खास द्योतक म्हणून काही वेळा गोंदले जाते. शूद्र जातीचे निदर्शक म्हणून गोंदून घेण्याचा प्रकारही अपरिचित नाही. १९ व्या शतकाचे अखेरपर्यंत, ज्या सैनिकांनी सैन्याची शिस्त मोडली आहे. अशांचे अंगावर BC - BAD CONDUCT म्हणजेच वाईट वर्तवणूक असे गोंदवले जात असे किंवा वाळवंटातील लोकांचे अंगावर D हे अक्षर गोंदवीत असत. काही जमातीत भ्याडपणा करणाऱ्याचे तोंडावर गोंदत असत. *(मॉरिस १९८८ : ८२,८३)*

महाराष्ट्र शब्दकोशात गोंदणे याचा अर्थ पुढीलप्रमाणे दिला आहे. "कांटा, सुई यांनी टोचून वर पाने चोळून कातड्यावर आकृती काढणे, अंगावर नक्षी काढणे (बायकांत रूढ). पूर्वी अपराध्यांना गोंदण्याची एक शिक्षाही असे." *(महाराष्ट्र शब्दकोश, विभाग तिसरा, १९३४ : १०२७)*

सर जेम्स फ्रेझर यांच्या मते गोंदणे ही कपडे वापरण्यापूर्वीची प्राथमिक अवस्था आहे आणि त्यात वापरले जाणारे रंग हे इतरांना आकृष्ट करण्यासाठी वापरले जात असत. *(फ्रेझर, १९००)*


बिहारमधील काही कलाकारांशी बातचीत करण्याचा योग आला. त्यांनी पुढील माहिती दिली.

जितवारपूर, केवलपट्टी वगैरे खेड्यांतून राहणारे हे लोक शूद्र वर्णाचे आहेत. त्यांच्या मते गोंदण्याच्या रंगाची माहिती त्यांना जवळ जवळ २००० वर्षांपासून उपलब्ध आहे.

पुरुषांपेक्षा स्त्रियांमध्ये गोंदून घेण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच तरुण मुलींपेक्षा, वयस्कर स्त्रियांमध्ये ते जास्त आहे.

साधारणतः गळ्यालगतचा छातीचा मधला भाग आणि मनगटापासून कोपऱ्यापर्यंतच्या हाताच्या भागावर गोंदून घेतात. उच्चवर्णियात गोंदून घेण्याचे प्रमाण इतरांचे तुलनेत कमी आहे. विवाहित, अविवाहित, कुमारिका किंवा इतर कोणीही स्त्री गोंदवून घेऊ शकते. साधारणतः ११ वर्षांपासून पुढच्या मुली गोंदवून घेतात. कारण त्या वयापर्यंत वेदना सहन करण्याइतकी सहनशक्ती त्यांच्यात आलेली असते. परंतु सौंदर्याच्या कल्पनाही कालानुरूप बदलत आहेत आणि गोंदून घेण्याची प्रथा हळूहळू कमी होत चालली आहे.

गोंदण्याच्या कलेतील प्रतिकांचे मुख्य विषय (Motifs) आजुबाजूच्या निसर्गातून आलेले दिसतात तसेच पौराणिक कथांमधून घेतलेले आढळतात. साहजिकच त्यात पाने, फुले, झाडे, प्राणी, पक्षी आणि पौराणिक व्यक्ती यांचा समावेश असतो.



गोंदणाऱ्या व्यक्ती एका विशिष्ट जातीच्या असतात. त्यांना 'नटीन' असे म्हणतात. हे लोक भटके असून, वर्षातून एकदा किंवा दोनदा प्रत्येक खेड्यात जातात. गोंदून घेण्याची कोणतीही ठराविक वेळ नाही. गोंदण्याच्या क्रियेत फारसा फरक झालेला नाही. दिव्याची काजळी, गायीच्या दुधात एकत्र करून सुईच्या सहाय्याने गोंदतात. वेदना आणि दाह कमी व्हावा यासाठी हळद आणि हिरवे गवत एकत्र ठेचून त्याचा लेप गोंदलेल्या जागेवर लावतात.

वरील चित्र हातावर गोंदतात. त्यात सर्वात डावीकडे हत्तीवर आरूढ झालेली व्यक्ती राजा सहेलजा ही आहे. त्यामागे घोड्यावर आरूढ झालेला त्याचा भाऊ मोतीराम हा आहे. घोड्याच्या मागील बाजूस त्यांचा तिसरा भाऊ उदेसार आहे. त्यांच्यामागे वाघावर आरूढ झालेली त्यांची बहीण मालीनदेवी ही आहे. चित्राच्या उजव्या बाजूला त्यांचा चूहरमल नावाचा रक्षक आहे. सबंध चित्राच्या पार्श्वभूमीवर गवताची पाती आहेत. चित्राला दुहेरी नागमोडी कड असून त्यावर त्रिशूलासारखे चिन्ह आहे.

हातावर इतके तपशीलवार आणि कौशल्यपूर्ण चित्र का काढतात हा प्रश्न विचारला असता, हे चित्र काढणाऱ्या जमुनादेवी म्हणाल्या, "आम्ही शूद्र लोक आहोत, अस्पृश्य आहोत. आम्हाला मंदिरात जायला मज्जाव होता. दर्शन घेण्याची मुभा नव्हती. तेव्हा देवाचे दर्शन घेण्याचा हाच सर्वात सोपा आणि सहज उपाय आहे. मनात आलं की मन तृप्त होईपर्यंत देवाचे दर्शन करता येते. आणि असं पहा, इथे मिळविलेलं सगळं इथेच सोडून जावं लागतं मग तो ब्राह्मण असो वा अस्पृश्य परंतु हातावर गोंदलेले देव आपल्या देहाबरोबर जाणार किंवा देव आपल्याला बरोबर नेणार म्हणा."

"तुमच्यात जसे राम, लक्ष्मण, भरत शत्रुघ्न आहेत तसे आमचे चार देव."

अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश नाही, दर्शनाचा हक्क नाही यावर त्यांनी काढलेला तोडगा लाजवाब आहे हे निश्चित.

दीर्घ काव्य

# भटकभवानी

## (काही अंश)

भुजंग मेश्राम

लोकांयले माहि कवता आवळते-विवळते
अस्से सम्दे देतात आसिरवाद
धोपटतात धोबीपछाड कुवडी पाठ
तव्वा, माहि कवता चालत नाही; - ऊडते!

माहि कवता ऊडते बुंईऽऽऽ
इवानावानी; हयवानावानी
बसते मठ्ठ बोवांच्या सेजारी-पाजारी
जेवते साहित्त संकुत्ती मंडळामधी
झोपते ज्येनं जेथी जागा देल्ली तेथी
हास्ते-विस्ते इद्रोही कवेसम्हेलनामधी
रळते-पळते इनोदी कवेसम्हेलनामधी
भटकते आकासवानी - टिवीच्या हापीसामंदी
चटकते आडरपर्मान भर्णाऱ्या काव्लाव पर्धेमंदी
सांडते अनुदानावाल्या पार्टर्यांयमंदी
भांडते जाकतिक मऱ्हाटा परषदेमंदी

आस्सी माहि कवता
हां हां कवता
लंकेची पारवता
सम्दे सम्दे विधी-बिदी उरकते
तव्वा थी उप्पर होते - सेहानी होते
थिलां दुनया समजू लाकते
काम-धंदा, येव्हार समजू लाकते
मंतानी, थी भटकायला मोकळी होते

माहि कवता जाते मंमैय मराठी ग्रतसंग्रालात
जिति हर्रोज सांकुतिक उर्साचा खरिप हंगाम
परसंवाद - चरचा - पुस्तोक परकासन - भासेन
काय वी ऱ्हावो
जिला मिरवता येत नाही ती कवता कसली!
मंतानी ती वी घेते टाळयां, रेपू रेपू रेपू
तिला सादते नजरबंदीची जादू
सोडते पेक्षकारांचे मुडपले हात
टाळयां देणारे ढवळे आस्ले तू
त्येंच्या बापाचं जात नाही, आणिक
ते हर्बऱ्याचं घेतात दुबार पिक
माहि कवता
काई, बिच्चारी, येडी-बिडी नाही
ती चालते-बोलते प्रेशक आसलं तस्सी!

माहि कवता जाते नवलेकक योजनेच्या नस्बंदी
सिबिरात
सिबिर मेळघाटात
सुदामकाका काळ्या डक्क अंधारात
धारणीची बातमी ज्येच्या त्येच्या होटांत
चुंङ्ग्यावानी पेटलेली...
वाट्टे, सिबिरात कुठी बुपास थू करा नै लाग्णार!
सरसोतीला भूकबळी थू नाही देणार?
पर परतेक मास्तर जड भासेत
सिकवतो विधी कसं करावं - बिरावं
माहि कविता मातूसत्ताक आसली तू बी
आंड ठेचल्या सांड्यावानी बोंबलते
डाँर डाँर, दुसरे जण डराव डराव
परतेकाला आनभावाचा सर्टीफिक्कट

मंतानी, मार्गदर्शन काय लिहावं-विहावं

माहि कवता जाते उच्चभ्रू गुत्यावर्ती
जिथी सम्दे, सम्दयायच्या कवता धुतल्या तांदळावानी
इचारवंत, नाचे, कारेकर्ते, सोंगाडे, लंवाडे
करतात दुनयेची टेम्परवारी काळजी
भरतात फुकटात सोताची पायली
पोट भरल्यावर्ती होते मह्या कवतेची फर्माइस
मंतेत, पेल्यावर्ती कवता सम्दी समजते
मनुन ज्योक सांगल्यावानी

माहि कवता हाव-भाव करून हासवते
कवता सम्दा दर-वार जिंकते
तिला मिळतो भारीचा वायदा
एकजण कोन्ट्यातला फकाट मंतो
'हिच्यात-नाचिनीत फरोक काय?'
बालंच्याले काय ठावोक
कवता कस्याला मंतेक?
जी सोता नाचत दुसऱ्याले नाचोते,
जी देवनवरीवानी देवाला सोडलेली
ती ती तिच कवता!
माह्याली तू आर्केस्ट्रात वी काम करते
मनुन सम्दे तिला मॉडन-मॉडन मंतत
आन्की काय पायजेत?

माहि कवता दळीत साहित्त अधिवेसनात
माहेरच्या पाहोनपणासाठी
वुदवत्ती लावतो एकादा मठवाला वोल
अधेक्स कहाडतो गळा, वाऽ वाऽऽ
आता हामचंवी नामांतर हो आय् पायजे
हामच्या इद्रोहाला मंजूरी मिळाय पायजे
हामचं एकलेव्यीकरण खुर्द-बुद्रूक सस्कुंत्रीकरण
होआय पायजे, इद्रोह ताजा तवाना ऱ्हान्यासाठी
पायजे दवा-दारू, लेखनात खोली वाढवाया
आणिक रहा-विहाला घर-विर...

प्रस्थापितांना धक्के देआयसाटी त्यैंच्या
स्टेजवर जायाचा, दिवाळी अंकात लेहाचा,
मानधन वाढवाचा एकमुखी ठराव
एकमतांनी, कवतेची भरली जाते ओटी

माहि कवता जाते फेस्टिवल ऑप इंडयामधी
सेकोटीवानी ऱ्हायते जळत-बिळत
आणते निशेस्त्र करांतीचं रंगीत सोंग
स्वातंत्र देवीवानी हातात पेटतं कोलीत
लंवाडा जिप्सीवानी तिचा ताल
फारिनर फोक फोक मनून पैसे फेकतात
आयफेल टावर वगून ती इसरते
कयलास परवत, फोर्ड चा वोर्ड वगून
वाचते हिटलिस्टची यादी
कवतेला स्वातंत्र देवीची लाकते गोडी
मंतानी, ती करते काकडारती

माहि कवता जाते राष्ट्रीय एकता उस्सवाच्या
भंडाऱ्यात
देसी सिनगारं, गणगोत जंजाळ,
रित-भात, बुजूर्ग हात संभाळत
ती जिंकून जाते सम्दायचं मन
बाकीजणी घागरे मिरवत मिरवत
गवळणीचा कालवा हाकत हाकत
वोटं मोडत जळजळाट.... एक पोट्टा मंते कसा,
'घुमनी मारे चोमनी
गलवतीचा वोभाटा'
रास्ट्रीय एकता मंजे
सर्वेजण मिळून विंग्रजी अगर हिंदीत
रंगपंचमी खेळणं
माहि कवता मागणी परमान वागते
मनुन्शान यक्तीमत्वाचा इकास साधते
बाकी झणीले विसनखी लागते!

आखिर माहि कवता जाते विपस्यना शिबिरात

शवुद न् वकुत याच्यातली गुंतागुंत,
निर्विकार मनातून सांडणारा आनंद,
इच्यार न् इकार याच्यातला ढासळतो पूल
मंतानी सिबिराची भूक लागते
लोकाले काय, थे तू काईवी मंतेत;
सव चुहे खाके विल्ली उर्फ विल्कीस
हाजको चली
किधरसे? तो पतली गली
सावलीवानी कवतेच्या पाठी अग्नीपरक्षा
सितामाइवानी
कवतेला जाआवं वाट्टे भुमीच्या कालकुप्पीत
पर थिला आवडते आत्मपरक्षा
आवडत नाही आत्महत्या
मनून तू तिची घोषणा
खाव खुज्याव वत्या बुजाव
फथरे आये तो दार लगाव
भौतीकवादाचा विंदू सरकते
विलासराबाकडं
अध्यात न् मध्यात तसा अध्यात्म
कवता डोळे मिटून
शुभ्रतेचे दुध पिते गटागट
तुटतात तशा आतल्या गाठी तटातट

माहि कवता जाते इधान सभेवर मोर्च्यात
तिला येइना पोहता-विहता
सर्कारी हमीच्या रोजंदारीला देऊ नै धोका
मंतानी ती मोर्च्याच्या काठा काठानं
झालाच चुकून गोळीबार लाठीमार
तर वुंई पळाला गल्ल्या हायीतच वंबाट
तरी वी घेतला जातोच शक
घोषणांयची कवता
वलुतेदार गुणवंता

कजाग आकांताची परकम्मा
अचाट मत-कांक्षेची पंचेफूला
लज्जा गवरी
देवाची नवरी
बोलणाऱ्यांचं सिवू शेकत नाही तोंड
हापल्यावी काळजाला येईना फोड
मंतानी गर्दीच्या आयन्यात
फायते थोवाड, तू गरोदर आभाळ
कवता जखम्यावानी सवुदवंवाळ...

माहि कवता जाते इंद्रावतीमध्ये सिकाले पोव्हनं
ओंडक्यावानी धारेत वाहू वाहू
तिला फूटू लालते कोंब
हाकारे आयकू आयकू
माराय सिकते बोंब
पोव्हता पोव्हता लाकते ताडोबा अभयारण
त्याहात फकत डोळा अगर कॅमेऱ्यानं
शिकार कराची परमिसन
मनून ती पाणोठ्याच्या कळपात मिसळते
पडताळते जंगली पशूताचा मतलव
पर्येटकाच्या डोळ्यातले विकार
सुसंकुतपणे चस्म्यात सुकरूप असतात,
त्याहले विचार मंतात
अस्सं सांगतो कांझरवेटर
तवा कवता सांगते साहेत्यातल्या हत्याकांडाबद्दोल
मंते, यातून वाचलेल्या कवताना
ठेवता येइल का गो अभयारणात?
डेफो म्हंतो, मंत्रालातून एनोसी आण!
कवता सटकते तेथून टापोटाप

माहि कवता कहिक दिसांनी येते मह्याकडं
बोलते धा गेले न् पाच न्हायल्यावानी
कडाडते जसी कडकलक्ष्मी
पर मंते, झालं गेलं इसरून जा
आता कवता आतभायेरून मोकळी

माहि कवता जाते भू भू भूतकाळात
"हां हां
मी भटकभवानी
सितामाई
रेणूकादेवी
जिवदानी
तिज्जनबाई
मस्या गणदोसासकट माहि मी!
पर तू?
तू तर भुसकावळा - वरून काळा आतून भूरा -
वेठीचा गवत्या - भारे वांदता बांदता धतूरा -
भुरटा कागदया - गिचमिड गिडमिड कारकूंडा -
मला बनवाय निगाला सावली
आन् सावलीची छतरी!
उनातानातून - काटाकुट्यातून,
पुरसी वागू वागू बदनाम झाले
तवा आनभवाचे वोल, सवल बनले!
मोडून टाकली चंचल खेळणी
फेडून टाकली देवनवरी
आता नेसली झाडापट्टी, हाती इंद्रावती

मातर कवी,
तू पांढराफट्टक वरफ पांघरलेला काळा पहाड
इतळत इतळत ढवळ पवळ
तुह्यात काहीच कामून नाहि खळबळ?
तू कोमामंदी जाण्या आंदीच
होवून जावं दे
सेवटून दुसरी
तुही - माही
लहानी लढाई!

❤❤❤

## श्रद्धांजली

श्रीमती मीरा तडवी या महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या एक कार्यकारी सभासद. परिषदेच्या प्रत्येक बैठकीस त्या जळगावहून आवर्जून उपस्थित राहायच्या. त्यांच्या अकस्मात निधनाने आमच्यातली एक मार्गदर्शक व सक्रीय कार्यकर्ती हरपली आहे. परिषद व हाकारा संपादक त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

***- कार्यकारी मंडळ / संपादक***

# सूची


अंक पहिला : जानेवारी-मार्च ................................ १९८० - जबरन जोत जंगल जमीन
अंक दुसरा : एप्रिल-जून ......................................१९८० - आदिवासी व शिक्षण
अंक तिसता : जुलै-सप्टेंबर ..................................१९८० - आदिवासी व वनसंवर्धन
अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर ............................१९८१ - आदिवासी साहित्य व कला
अंक पाचवा : जानेवारी-मार्च ................................१९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती
अंक सहावा : एप्रिल-जून......................................१९८१ - आदिवासी व आरोग्य
अंक सातवा : ऑक्टोबर-डिसेंबर ............................१९८१ - रोजगार हमी योजना
अंक नववा : ऑक्टोबर-डिसेंबर ............................१९८१ - उत्तारा खंड अभ्यास मोहीम
अंक दहावा : एप्रिल-जून ......................................१९८२ - धरणे व विकास
अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर ............................१९८२ - जंगल व्यवस्थापन
अंक तेरावा : जानेवारी-मार्च ................................१९८३ - आदिवासी व दारू
अंक चौदावा : एप्रिल-जून ..................................१९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर ................................१९८३ - प्रा.सरदार गौरव अंक/आदिवासी साहित्य
अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर ........................१९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
अंक सतरा-अठरा : जानेवारी-जून............................१९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर ............................१९८४ - आदिवासी स्त्री
अंक विसावा : ऑक्टो.-डिसेंबर ............................ १९८४ - आदिवासींचे आरोग्य व शिक्षण
अंक एकविसावा : जानेवारी-मार्च............................१९८५ - आदिवासी संघटन
अंक बाविसावा : एप्रिल-जून ................................१९८५ - जमीन हस्तांतर
अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर................................१९८५ - आदिवासी महिला
अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ........................१९८५ - आदिवासी व सरकार
अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च ..........................१९८६ - जंगल व धरण
अंक सव्विसावा : एप्रिल-जून ................................१९८६ - आदिवासी कला
अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर ............................१९८६ - आदिवासी व वेठबिगारी
अंक अठ्ठाविसावा : आक्टोबर-डिसेंबर......................१९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च ......................१९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
अंक तिसावा : एप्रिल-जून ..................................१९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर ...................... १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
अंक तेहतीस : जानेवारी-मार्च ............................१९८८ - सवलती अपहरणाची समस्या
अंक चौतीस : एप्रिल-जून ..................................१९८८ - आदिवासी सात्यि
अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर ........................१९८८ - आदिवासी समाज व संस्कृती
अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून ................ १९८९ - डॉ. वेरीर एलवीन विशेषांक
अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर ..................१९८९ - व्यवसाय मार्गदर्शन
अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून..................१९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर ............................१९९० - जागतिक आदिवासी
... चव्वचाळीस : आक्टोबर-डिसेंबर ...................... १९९० - गं.बा. सरदार स्मृति विशेषांक
अंक पंचेचाळीस-सेहचाळीस : जानेवारी-जून ............ १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर ........................१९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर ...................... १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती
अंक एकोणपन्नास-पन्नास : जानेवारी-जून....................१९९२ - सर्वसाधारण आदिवासी
अंक एक्कावन-बावन : जुलै-डिसेंबर ........................१९९२ - अनुताई वाघ विशेषांक
अंक त्रेपन-चोपन्न : जानवारी-जून ........................१९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव
अंक पंचावन्न-छप्पन : जुलै-डिसेंबर ...................... १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

आजीव सभासद ३०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ३० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.



**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

हाकारा त्रैमासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांचेकडून अर्थसहाय्य मिळाले आहे.

Omega Offset, Bgm. Ph:424124